# उत्तम उपचार यंत्रणा उभारण्यास शासन कटिबद्ध

## एनसीआयच्या लोकार्पण कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर येथे उभ्या राहिलेल्या नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटमुळे (एनसीआय) कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ही संस्था विदर्भासह मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा या मध्य भारतातील राज्यांसाठी आरोग्य मंदिर ठरत आहे. राज्यातही उत्तम आरोग्य यंत्रणा उभारण्यासाठी शासन कटीबद्ध आहे असे प्रतिपादन ,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

समृद्धी महामार्गाच्या झिरो माईल शेजारी जामठा परिसरात स्थित राष्ट्रीय कर्करोग संस्थेचे (नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट) सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्या हस्ते आज लोकार्पण झाले. या सोहळ्यास मुख्यमंत्री श्री. शिंदे मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार चंद्रशेखर बावनकुळे, नॅशनल कँसर इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष ॲड. सुनील मनोहर, माजी खासदार तथा उपाध्यक्ष अजय संचेती, मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जोगळेकर उपस्थित होते. कार्यक्रमाला विधासभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उद्योग व वाणिज्य क्षेत्रातील दिग्गज गौतम अडाणी, दिलीप सिंघवी, समीर मेहता, पार्थ जिंदाल आणि जयप्रकाश रेड्डी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, (एनसीआय) या संस्थेला सेवाव्रती कार्यासाठी सर्वप्रथम मनापासून शुभेच्छा देतो. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व मेहनतीतून ही संस्था निर्माण झाल्याचे सांगत त्यांनी श्री. फडणवीस यांचे अभिनंदन केले. राज्यासमोर आरोग्य सेवा हे मोठे आव्हान आहे. नुकताच कोरोना संकटाचा अनुभव आपण घेतला असून हवामान बदल, उष्माघात या प्रमाणेच कॅन्सर ही मोठी समस्या म्हणून पुढे येत आहे. श्री. फडणवीस यांचे वडील, त्यांचे सहकारी श्री. शैलेश जोगळेकरांच्या पत्नी आणि माझ्या आईचा मृत्यू कॅन्सरनेच झाल्याचा उल्लेख करुन या वेदनादायी आठवणी मागे ठेवत सार्वजनिक हितासाठी लोकप्रतिनिधींनी असे दृष्य कार्य करायचे असते आणि हाच मार्ग आम्ही अवलंबल्याचे त्यांनी सांगितले.



### देशाला कॅन्सरमुक्त करण्यासाठी एनसीआय उपयुक्त ठरेल – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

*कॅन्सरवरील उपचारासाठी आता विदर्भातील रुग्णांना मुंबई व अन्य ठिकाणी न जाता एनसीआयमध्ये नागपुरातच अत्याधुनिक उपचार घेता येणार आहेत. ही संस्था उत्तम उपचार आणि संशोधनामुळे देशाला कॅन्सरमुक्त करण्यास उपयुक्त ठरेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला. अमेरिकेत कँसरच्या रुग्णांमध्ये ३३ टक्क्यांनी घट झाली आहे. मात्र, भारतात कॅन्सर रुग्णांची संख्या वाढत आहे. एनसीआय सारख्या संस्था देशात उभ्या राहिल्यास कॅन्सर रुग्णांची संख्या कमी होईल व देश या आजारापासून मुक्त होण्यास उपयुक्त ठरतील, असेही ते म्हणाले.*

### कॅन्सरवरील अत्याधुनिक उपचार पद्धती व संशोधन केंद्र उभारणार –उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

*उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विदर्भातील कॅन्सर रुग्णांना मुंबईसह देशाच्या अन्य भागात उपचारासाठी जावे लागत असे. यावर कायम तोडगा काढण्यासाठी ३० वर्षांपासून पाहिलेले स्वप्न एनसीआयच्या माध्यमातून पूर्ण झाल्याचा आनंद आहे. या संस्थेच्या माध्यमातून विदर्भ, महाराष्ट्रासह मध्य भारतातील कर्करोगाच्या रुग्णांना स्वस्तात उत्तम उपचार उपलब्ध होणार आहेत. हे कार्य पुढे घेऊन जात रुग्णांच्या नातेवाईकांच्या नि:शुल्क निवासासाठी येथे धर्मशाळा उभारण्यात येणार आहे. पूर्व विदर्भात थॅलेसेमिया आणि सिकलसेल आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणात असून या आजारावर संशोधन व उपचार करण्यासाठी येत्या काळात एनसीआयमध्ये संशोधन केंद्र उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. शैलेश जोगळेकर यांनी सूत्रसंचालन केले.*

मुख्यमंत्री असताना फडणवीस यांनी विदर्भासाठी वरदान ठरणाऱ्या हिंदूह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाची संकल्पना मांडली व हा प्रकल्प पूर्णत्वास घेवून जाण्यासाठी मेहनत घेतली. या घटनेचा साक्षीदार असल्याचे त्यांनी सांगितले. एनसीआयची नागपुरात उभारणी करण्याची संकल्पना मांडून तीही उपमुख्यमंत्र्यांनी पूर्णत्वास नेली. घेतलेले काम पूर्णत्वास नेण्याची त्यांची खुबी आहे. ही संस्था उभी राहणे मोठी उपलब्धी व ऐतिहासिक कामगिरी आहे. सर्व सामान्य रुग्णांना यामुळे मोठा दिलासा मिळेल. ही संस्था विदर्भासह महाराष्ट्र व मध्यभारतातील कॅन्सर उपचारासाठी आरोग्य मंदिर ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या संस्थेला लोकप्रतिनिधींनी भेट देऊन या कार्यातून प्रेरणा घ्यावी व आपापल्या भागात अशी सेवाव्रती आरोग्य मंदिरे उभारावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली. अशा संस्थांच्या पाठीशी राज्य शासन भक्कमपणे उभे राहिल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला .

राज्य सरकार सर्व सामान्य जनतेला उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देत आहे. 'मुख्यमंत्री सहायता कक्ष', 'महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना' आणि 'मुख्यमंत्री सहायता निधी' मधून भरघोस मदत करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

# माणगाव येथे ट्रकची रिक्षाला धडक; महिला जागीच ठार



**माणगाव : रामप्रहर वृत्त**

मुंबई गोवा महामार्गावर अपघाताची मालिका सुरूच आहे. २७ एप्रिल रोजी सायंकाळच्या दरम्यान माणगाव रेल्वेस्थानकाजवळ टायर वाहतूक करणारा टेम्पो व रिक्षामध्ये अपघात झाला असून या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

२७ एप्रिल रोजी ३:३० वा.च्या सुमारास घटनेतील टायर वाहतूक करणाऱ्या ४०७ टेम्पो चालक आरोपीत राकेश सिताराम मोरे, वय २७ वर्ष, रा. कोपरखैरणे याने त्याच्या ताब्यातील टाटा टेम्पो ४०७ क्र. एम एच ०१ सी व्ही ६०२८ हा मुंबई बाजूकडून घेऊन येत असताना हयगयीने, बेदरकारपणे, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करीत चालवून माणगांव रेल्वे स्थानकजवळ आल्यावेळी माणगांव बाजूकडून येणाऱ्या रिक्षा क्र. एम एच ०६ बी व्ही ३६२८ हिस ठोकर मारून अपघात केला.

या अपघातात रिक्षात बसलेले हर्षल वाडेकर, प्रकाश नांदगावकर हे जखमी झाले असून प्रमिला नांदगावकर यांचा मृत्यू झाला आहे. घटनेतील फिर्यादी हर्षल वाडेकर हे मृत महिला प्रमिला नांदगावकर यांचे नातू असल्याचे समजले आहे .तसेच त्यांचे पती प्रकाश नांदगावकर हे देखील जखमी झाले आहेत त्याचप्रमाणे रिक्षा चालक देखील जखमी झाला आहे.हे नांदगावकर कुटुंब माणगांव मधील आपल्या नातेवाईकांकडे वास्तुशांती (गृहप्रवेश) कार्यक्रमासाठी आलेले असताना मुंबईकडे परतताना त्यांच्यावर काळाने घाला घातला.

घटनेची माहिती मिळताच माणगांव शहरातील सिद्धिविनायक रिक्षा युनियनचे अध्यक्ष विजय भादावकर तसेच संघटनेचे कायदेविषयक सल्लागार व जेष्ठ पत्रकार डॉ आरिफ पागारकर व सर्व रिक्षा युनियन सदस्य यांनी घटनास्थळी धाव घेतली व वाहतूक पोलिसांसोबत मदत कार्य केले. या अपघाताची नोंद माणगांव पोलीस ठाणे येथे कॉ. गु. र. नं. १३०/२०२३ भा. दं. वि. सं. क. ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, मो. वा. का. क. १८४ प्रमाणे करण्यात आली असून पुढील तपास पो. नि. राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो स ई किर्तीकुमार गायकवाड हे करीत आहेत.

पान १ वरून

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली उसर प्रकल्पग्रतांच्या संघर्षाला यश

यापैकी प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेणे, स्थानिकांना प्रथम प्राधान्य, स्थानिकांकडे असलेल्या मालवाहतूक ट्रक, डम्परला सामान मटेरियल सप्लाय देणे, सध्या सुरू असलेल्या प्रत्येक कॉन्ट्रक्टमध्ये स्थानिकांची नेमणूक करणे, प्रकल्पबाधित गावांना एमआयडीसीचे पाणी अल्पदरात उपलब्ध करून देणे, प्रकल्पबाधित गावांना गेल कंपनीच्या लाईनवरून वीजजोडणी करून देणे आदी महत्त्वाच्या मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा होऊन त्यांची पूर्तता येत्या दोन महिन्यांत करण्याचे आश्वासन कंपनी व्यवस्थापनाने दिले आहे.

गेल इंडिया लि.ने उसर येथे नव्याने येत असलेल्या पॉलिमर कंपनी प्रकल्पासाठी नाईक कुणे, कंटक कुणे, धसाडे कुणे, उसर, धोटवडे, मल्याण या सहा गावांतील २४७ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. या सहा गावांतील प्रकल्पग्रस्तांच्या उसर शेतमजूर संघटनेच्या वतीने कंपनी व्यवस्थापनाविरोधात गेल्या वर्षी गेट बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता व त्याचे निवेदन कंपनी व्यवस्थापनास दिले होते. या संघटनेने प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांना साकडे घातले होते. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांनी नाईक कुणे येथे प्रकल्पग्रस्तांसोबत १३ नोव्हेंबर रोजी संवाद साधून चर्चा केली व प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य न केल्यास आंदोलनाशिवाय पर्याय नाही, असा इशारा दिला होता तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी त्यांनी राज्याचे उद्योगमंत्री व रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांना १४ नोव्हेंबर रोजी निवेदन दिले होते.

## घरकुल, पाणी, पुनर्वसनाबाबत आदिवासींना मिळणार दिलासा

याबाबत प्रांताधिकारी यांच्याशी चर्चा करून योग्य लाभार्थ्याला कशा पद्धतीने दाखला उपलब्ध करता येईल या दृष्टिकोनातून या बैठकीत चर्चा झाली. ठाकूर वाडीत शासनाचे प्रतिनिधी पाठवून लाभार्थ्यांची कागदपत्रे तपासताना त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न व्हावेत, जेणेकरून जास्तीत जास्त बांधवांना घरकुल योजनेचा लाभ मिळेल.

कुटुंबातील जातीचा दाखला किंवा तत्सम कागदपत्रे सरळ, सोप्या पद्धतीने मिळाल्यास लाभार्थींना अडचणींपासून मुक्तता मिळेल. त्यासाठी प्रत्येक ठाकूर समाजातील वाडीत जाऊन त्या ठिकाणी शिबिर घेऊन मार्गदर्शन करावे, असे आमदार महेश बालदी यांनी सूचित केले. त्यानुसार लवकरच तशा प्रकारची कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रांताधिकारी यांनी दिले.

यासोबत मे महिन्यात होणाऱ्या पाणीटंचाईसंदर्भातही आमदार महेश बालदी यांनी चर्चा करून आदिवासी वाड्या, पाड्यांना पाणी पोहचवण्याच्या सूचना केल्या.

त्याचबरोबर कर्नाळा अभयारण्याचा विस्तार वाढल्यामुळे आपटा ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या घेरावाडीचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. त्यामुळे या विषयावरही या बैठकीत चर्चा झाली.

त्या अनुषंगाने त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी वनखात्याच्या मालकीची असलेली जागा योग्य व मुबलक ठरणार आहेत. त्याबाबत जागेचा शोध घेऊन त्याचा अहवाल वन व महसूल विभागाने देण्याचे प्रांताधिकारी राहुल मुंडके यांनी आदेश दिले. त्यानंतर या अनुषंगाने पुढील बैठक वनमंत्री यांच्याकडे घेण्याचे आमदार महेश बालदी यांनी सांगितले. त्यामुळे आदिवासी ठाकूर समाजातील कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## दै. रामप्रहरचे मुख्य संपादक देवदास मटाले यांना स्व. संतोष पवार स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, रायगड टाईम्सचे संपादक राजन वेलकर यांनीही स्व. संतोष पवार यांच्याप्रति असलेल्या आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष अजय सावंत, राजेश लाड, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माजी गटनेते प्रसाद सावंत, नितीन कांदळगावकर, मधुकर घारे, बळवंत घुमरे, प्रभाकर पवार, रंजना धुळे, मीना प्रभावळकर, प्रवीण सकपाळ, अंकुश दाभणे, दिलीप गडकरी, वसंत मोधळे, पराग बोरसे, प्रसाद पाटील, प्रशांत गोपाळे, वसंत ठाकूर, सुरेश कुरतडकर, हनुमंत भांगे, राहुल वैद्य, पूजा सुर्वे, डॉ. मोहन काळे, अशोक शिंदे, राजाभाऊ कोठारी, डॉ. प्रशांत सदावर्ते आदी उपस्थित होते.

कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष राहुल देशमुख यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रेमानंद गोसावी यांनी केले, तर सचिव दीपक पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

माजी नगरसेविका अनिता पाटील, नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे, किर्ती नवघरे, संजय भगत, पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ, भाजप नेते प्रभाकर जोशी, रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, पीआरओ बाळासाहेब कारंडे, पर्यवेक्षक अनिता मिश्रा, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या प्रिन्सिपल राज अलोनी, पर्यवेक्षक इफात काते, चश्मिंदर कौर बक्षी, अरविंदर कोतवाल, गीता चौधरी यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

# शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धेचा पुरस्कार सर्वांचा –आयुक्त गणेश देशमुख

## पनवेल महानगरपालिकेच्या स्वच्छता स्पर्धांचे बक्षीस वितरण



**पनवेल : प्रतिनिधी**

शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धेचा पुरस्कार माझा एकट्याचा नाही सर्व अधिकारी कर्मचारी, माजी पदाधिकारी, महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला त्या सर्वांचा हा पुरस्कार आहे. प्रत्येकाचा हा सन्मान आहे. हा पुरस्कार सर्वांच्या प्रयत्नाचे यश आहे, असे प्रतिपादन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले.

शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्यातून पनवेल महानगरपालिकेस 'ड' वर्ग महानगरपालिका या गटामध्ये प्रथम क्रमांक मिळाला. आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयुक्त देशमुख यांच्या हस्ते सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. या कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. यावेळी उपायुक्त सचिन पवार, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, उपायुक्त कैलास गावडे, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते उपस्थित होते. यावेळी उद्यान विभागाच्यावतीने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात असलेल्या उद्यानांची माहिती देणाऱ्या संकेतस्थळाचे व कॉफीटेबल पुस्तकाचे अनावरण आयुक्तगणेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. उपायुक्त कैलास गावडे यांनी या प्रकल्पाची माहिती उपस्थितांना दिली. तसेच यावेळी याविषयावरील व्हिडीओ प्रदर्शित करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत श्री नटराज एंटरप्रायझेस निर्मित, अब्स्ट्रॅक्ट थिएटर प्रस्तुत लघुनाटिका पाप पुण्याच्या पाढा सादर करण्यात आला. नाटिकेतील सर्वांचा यावेळी आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये महापालिकेचे पाणीपुरवठा विभाग प्रमुख विलास चव्हाण, विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील, उद्यान विभाग प्रमुख राजेश कर्डिले, भांडार विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, वाहन विभाग प्रमुख राजेश डोंगरे, उपअभियंता सुधीर सांळुखे, चार प्रभाग अधिकारी, स्वच्छता निरीक्षक या सर्वअधिकाऱ्यांचा आयुक्तांच्या हस्ते प्रशस्तीप्रत्रक देऊन सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, **मौजे जांभिवली, ता. पनवेल, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची शेत मिळकत ही खालील नमुद मिळकत ही सामाईक नावे आहे. सदरची शेतजमिन ही नियंत्रित सत्ता प्रकाराची आहे. सदर मिळकत खालील नमुद कब्जेदार याचे मालकीची व वहीवाटीची असुन ताबेकब्जात आहे. सदर मिळकतीचे टायटल व निर्वेध हक्क तपासण्याकरीता ही नोटीस आमचे अशिल देत आहेत. सदर मिळकत आमचे अशिल खरेदीखताने विकत घेत आहेत त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे जांभिवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| कब्जेदाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आ.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|
| पार्वती शंकर कोंडीलकर<br>मारुती शंकर कोंडीलकर<br>पांडुरंग शंकर कोंडीलकर<br>अंनता शंकर कोंडीलकर<br>लक्ष्मण शंकर कोंडीलकर<br>हरिभाऊ शंकर कोंडीलकर<br>जनाबाई देवराम ठोंबरे | १२८ | १० | ०–५४–०<br>०–०५–००<br>०–५९–०० | १.२५ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, एम.ओ.यु, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकती चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक :– २८/०४/२०२३**

**सही/–**
**ॲड. सचिन बी. कोंडीलकर,**
**शॉप नं. १४२, म्युनिसीपल शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. ९८३३३०६३६१**

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य. विभाग, पनवेल

**ई– निविदा सुचना क्र. १३५ सन २०२२–२३ ( दुबार मागणी)**

देखभाल व दुरुस्ती जे.एन.पी.टी. पाणी पुरवठा योजना (पूर्णठेव), ता. उरण, जि. रायगड – अंतर्गत रांजणपाडा ते करळफाटा दरम्यान रस्ता करणे या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रू.१,२४,३८,९००/– आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि.०२/०५/२०२३ पासून **www.mahatenders.gov.in** या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक :– २५/०४/२०२३

**सही/–**
**(व्ही. के. सुर्यवंशी)**
**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग पनवेल**

## PANVEL MUNICIPAL CORPORATION

Tender Notice No:- pmc/swm/2523/sr.no.149/367/2023

Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel Invites Request for Proposal (RFP) tenders through e- tendering system from experienced and competent bidders for **"Appointment of Branding & Marketing consultant for branding of Panvel City for a period of 7 months".** The blank forms and the detailed information regarding tenders will be available on the website www.mahatenders.gov.in from 02/05/2023 to 16/05/2023 up to 3:00 PM. The completed tenders are to be uploaded until 16/05/2023 up to 03:00 PM and the tenders will be open on17/05/2023 at 03:00 PM if possible.

| Sr.No. | Name of the work | Cost of Blank Tender form (to be paid Online only) | Earnest Money Deposit (to be paid Online only) | Duration of Work |
|---|---|---|---|---|
| 1 | "Appointment of Branding & Marketing consultant for branding of Panvel City for a period of 7 months" | INR 5,000/- only | INR 20,000/- only | 7 months |

A pre-bid meeting will be held on 08/05/2023 at 11:00AM at Conference room of the Panvel Municipal Corporation, Panvel. Bidders need to carry hard copy of the queries

Rights to reject any or all tenders without assigning any reasons thereof are reserved by Commissioner, Panvel Municipal Corporation and whose decision will be final and legally binding on all the tenderers.

**Sd/-**
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation Panvel**

## निवडक

### उबेरचालकाला दोघांनी लुटले

**पनवेल :** कळंबोली येथे एका उबेरचालकावर दोघांनी वार करून लुटल्याची घटना घडली. पोलिसांनी लुटारूंविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. उबेरचालक अबु बक्कर ताहेजअली सिद्धिकी हा कळंबोली ब्रीजजवळील पंपावर सीएनजी भरण्यासाठी गेला होता. त्यानंतर रात्री गाडीतच झोपला. पहाटे दोघा लुटारूंनी अबुला मारहाण केली. पाठीत वार करून त्याला जखमी केले व त्यानंतर त्याच्या खिशातील मोबाईल फोन व रोख रक्कम लुटून ते पसार झाले. या घटनेची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मातीचोरीप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** साधारण ५०० ब्रास मातीची चोरी केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उलवे, सेक्टर २ येथे राहणारे अशितोष लक्ष्मण सोळसे हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सिडको यांच्या सीबीडी बेलापूर येथील ऑफिसला हजर होते. या वेळी सुरक्षा पर्यवेक्षक यांनी ऑफिसला येऊन कळवले की, सेक्टर २ पुष्पक नगर या ठिकाणी नैसर्गिक मातीचे उत्खनन झालेले आहे. या वेळी ते घटनास्थळी आले असता सर्व्हे नंबर १३३ चा ५ ए आणि ५ बी या ठिकाणी मोठा खड्डा खोदलेला आढळून आला. साधारण ५०० ब्रास माती चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. साडेसात लाख रूपये किमतीच्या ५०० ब्रास काळी मातीची चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अपघातात तीन जण जखमी

**पनवेल :** भरधाव वेगाने रिक्षा चालवून ओव्हरटेक करण्याच्या नादात दुचाकीला धडक मारल्याने तिघेजण जखमी झाले आहेत. याप्रकरणी रिक्षाचालकाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहम्मद नसीम जमील अहमद खान हे नेवाळी गाव येथे राहत असून, ते दुचाकीवरून नेवाळीगाव येथून टेंभोडे ब्रिजकडे जाणाऱ्या रोडने नवीन पनवेलला जात होते. अष्टविनायक ढाब्याच्या समोरील रस्त्यावर रिक्षाचालक एका अज्ञात वाहनास ओव्हरटेक करताना खान यांच्या स्कुटीला बाजूस धडक बसली. या अपघातात पत्नी स्नेहल, मुलगी ईकरा व मोहम्मद हे तिघेही खाली पडले व ते जखमी झाले.

### गाडीतून मौल्यवान ऐवजाची चोरी

**पनवेल :** रस्त्याच्या कडेला उभ्या ठेवलेल्या चारचाकी वाहनाची काच फोडून आतील मौल्यवान ऐवज चोरी केल्याची घटना घडली आहे. पूजा औडद्रा यांनी त्यांची गाडी रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवली होती. याचवेळी अज्ञात चोरट्याने या गाडीची काच फोडून गाडीमधील कारटेप, सोन्याची चैन, एअरपोड्स व रोख रक्कम असा किमती ऐवज चोरून नेला.

### उद्यापासून ध्यान साधना शिबिर

**पनवेल :** शहरातील जैन स्थानक, कापड बाज़ार येथे ३० एप्रिल ते १० मेपर्यंत विपश्यना ध्यान साधना निवासी शिबिर आयोजित केले आहे. पूज्य गोयेंकाजींनी सम्पूर्ण विश्वात या ध्यान पद्धतिचा प्रसार केला. इगतपूरी, सीवूड्स अशा अनेक ठिकाणी शिबिर होत असतात. पनवेलकरांच्या सोयीसाठी प्रथमच पनवेलमध्ये शिबिर होत आहे. हे शिबिर सम्पूर्ण नि:शुल्क असुन दानदात्यांच्या सहयोगातून शिबिराचा खर्च चालतो. शिबिरात फक्त पुरुषांनाच प्रवेश आह. मोबाइल जमा करून १० दिवस तेथेच रहावे लागेल. आयोजकातर्फे नाश्ता आणि जेवणाची व्यवस्था आहे. २९ एप्रिलपर्यंत आगाऊ नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी सुनील नखाते (९८९२७२३१३४), निकेश कासारे (९६९९९३७१३४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ओरियन मॉलमध्ये उद्या लकी ड्रॉ

**पनवेल :** पनवेलमध्ये खरेदीसाठी ग्राहकांची पहिली पसंती असलेले ओरियन मॉलच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त नशीबवान विजेत्यास सिंगापूर टूर तसेच ओला एस वन इलेक्ट्रिक बाइकची संधी मिळणार आहे. याचा लकी ड्रॉ हास्यजत्रा फेम अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या हस्ते रविवारी (दि. ३०) संध्याकाळी ७ वाजता ओरियन मॉलमध्ये काढण्यात येणार आहे. यामध्ये पहिल्या विजेताला सिंगापूर टूरची सुवर्णसंधी मिळणार आहे, तर दुसऱ्या विजेत्याला ओला एस वन इलेक्ट्रिक बाइक मिळणार आहे. त्यामुळे सर्वांनी या संधीचा फायदा घेऊन मॉलमध्ये भरपूर शॉपिंग करा आणि या स्पर्धेत सहभागी व्हा, असे आवाहन ओरियन मॉलचे डायरेक्टर मंगेश परुळेकर व मनन परुळेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षकांनी संशोधनाला प्राधान्य द्यावे

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्राध्यापकांना मार्गदर्शन



(छाया : योगेश पाटील)

### रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचा समारोप

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात २४ ते २८ एप्रिलदरम्यान महाविद्यालयात वर्कशॉप व सेमिनार समिती व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय पातळीवर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन केले होते. शुक्रवारी (दि. २९) फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचा समारोप करण्यात आला. यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्राध्यापकांना संशोधनाला प्राधान्य देण्याबाबत मार्गदर्शन केले.

शुक्रवारी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम अंतर्गत पहिल्या सत्राचे आयोजन नॅक ऍक्रेडिएशन तसेच नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० याविषयी केले होते. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. बी. डी. आघाव व डॉ. निलेश वडनेरे (चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स व सायन्स महाविद्यालय, स्वायत्त पनवेल) यांनी सहभागी झालेल्या प्राध्यापकांना मार्गदर्शन केले तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी सहभागी प्राध्यापकांना अध्ययन-अध्यापनांमधील बारकावे, संशोधन तसेच प्राध्यापक म्हणून असणाऱ्या वेगवेगळ्या अकॅडमीक जबाबदाऱ्या याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

याचदिवशी दुपारी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित राहून त्यांच्या हस्ते पाच दिवशीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये सहभागी झालेल्या वेगवेगळ्या महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहभागी झाल्याबद्दल प्रमाणपत्रे देण्यात आली तसेच त्यांनी प्राध्यापकांना संशोधन हा शिक्षकाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

या एका सत्राचा लाभ रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील तसेच इतर मुंबई विद्यापीठात संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयातील सुमारे ४० प्राध्यापकांनी घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी प्रमुख पाहुण्यांचे व वक्त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत केले तसेच पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचा अहवाल सादर केला तसेच उपस्थित प्राध्यापकांना एक संशोधक म्हणून संशोधनासाठी लागणारी मानसिकता, रिलायझेशन ट्रान्सफॉर्मेशन व सस्टेनन्स याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व संशोधनासाठीशुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) हे सर्व उपस्थित होते.

या दोन्ही सत्रांमध्ये प्रमुख वक्त्यांची ओळख व सूत्रसंचालन प्रा. गायत्री काळे व प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी व प्रा. डॉ. फारुक शेख (समन्वयक कार्यशाळा व चर्चासत्र समिती) यांनी सर्वांचे आभार मानले.

## सीकेटी कॉलेजमध्ये बँकिंग भरती परीक्षेच्या वर्गासाठी प्रवेश सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) वाणिज्य, कला, विज्ञान, महाविद्यालयातील डॉ. सी. डी देशमुख (बँकिंग) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे बँकिंग व वित्तीय क्षेत्रातील नोकर भरतीच्या पूर्वतयारीसाठी ९ मे ते ९ जून २०२३ या कालावधीत दररोज सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत उन्हाळी वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

देशातील राष्ट्रीयकृत बँका, खासगी बँका, सहकारी बँका तसेच विविध प्रकारच्या इतर वित्तीय संस्थांमधील प्रोबेशनरी ऑफिसर, क्लर्क, असिस्टंट मॅनेजर, असोसिएट, एलआयसी ऑफिसर इत्यादी पदांच्या नोकर भरतीसाठी इन्स्टिटच्यूट फॉर बँकिंग पर्सनल सिलेक्शन म्हणजेच आयबीपीएसद्वारे नोकर भरतीच्या परीक्षा घेतल्या जातात. महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशानुसार आता राज्यातील सर्व नागरी सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांमधील सर्व प्रकारची नोकर भरतीदेखील आयबीपीएसच्या धर्तीवर होणार आहेत. त्यामुळे बँकिंग व वित्तीय क्षेत्रातील नोकर भरतीच्या या सर्व परीक्षांची योग्य तयारी करून घेण्यासाठी या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रशिक्षण वर्गात गणितीय व सांख्यिकीय अभियोग्यता, बुद्धिमापन, तार्किक योग्यता, इंग्रजी भाषा व बँकिंगची तयारी करून घेतली जाणार आहे. याकरिता तज्ज्ञ व अनुभवी मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यात आलेली असून या प्रशिक्षण वर्गामध्ये बारावीची परीक्षा दिलेले विद्यार्थी आणि पदवीच्या अंतिम वर्षाला असणारे तसेच पदवी पूर्ण झालेले विद्यार्थी विद्यार्थिनी प्रवेश घेऊ शकतात. हा मार्गदर्शन वर्ग सर्वांसाठी खुला असून इतर महाविद्यालयातील विद्यार्थीदेखील प्रवेश घेऊ शकणार आहेत. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ग्रंथालय व अभ्यासिकेसह प्रवेश आणि फक्त लेक्चर्सकरिता प्रवेश असे दोन पर्याय देण्यात आलेले आहेत.

मार्गदर्शन वर्गात प्रवेश घेऊन संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील व बँकिंग स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक विजय शितोळे आणि संजय हिरेमठ यांनी या मार्गदर्शन वर्गास प्रवेश घेऊन संधीचा लाभ घ्यावा. प्रवेशाकरिता ऑनलाईन अर्ज https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLScCjcnsmw3JNd8Iy-YVV_TJqyF_oPGG3_CGaoMxVgMwPfRfTg/viewform?usp=pp_url येथे भरून ५ मे २०२३अखेर आपला प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ९२२३५५५७७९, ९८३३१७७५५१, ९८६७४९८१६७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ओवे येथे अपघातात दुचाकीचालक जखमी

**पनवेल :** एनएमएमटी बस वळण घेताना दुचाकीची बसला धडक बसली. या अपघातात दुचाकीचालक गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी बसचालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. थानसिंग केससिंग राजपुरोहित हे मोटरसायकलवर खारघरकडून करंजाडे या ठिकाणी जाताना सीआयएसएफ कॅम्प ओवे गाव चौकीसमोर आले. या वेळी एनएमएमटी बसने अचानक वळण घेतल्याने थानसिंग यांचा अपघात होऊन पायाला दुखापत झाली. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## पनवेलमध्ये पर्यावरणाचा जागर

### महापालिका आणि पिल्लई महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

माणसाच्या वाढत्या हव्यासामुळे हवामानात बदल होत आहे. माझी वसुंधरा या अभियानाच्या माध्यमातून पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न शासन करीत असल्याचे प्रतिपादन उपायुक्त कैलास गावडे यांनी केले. पनवेल महापालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत पिल्लई कॉलेजमध्ये साजरा करण्यात येणाऱ्या अर्थ आठवडा कार्यक्रमात ते बोलत होते.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली २२ ते २८ एप्रिलदरम्यान 'अर्थ आठवडा' साजरा करण्यात येत आहे. त्या निमित्त पनवेल महापालिका आणि पिल्लई आटर्स, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, युनीसेफ,नेहरू युवा संघटन, इन्फिनीटी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानातून अर्थ आठवड्यांतर्गत ऊर्जा संवर्धन आणि पर्यावरण संरक्षण या विषयांतर्गत युथ क्लायमेट कॉन्क्लेव्ह कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी (दि. २६) पिल्लई कॉलेजमध्ये करण्यात आले होते.



या वेळी युनीसेफचे राज्य् सल्लागार डॉ. तानाजी पाटील, पिल्लई कला, वाणिज्य् आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन वडेर, उपप्राचार्य दिपिका शर्मा, डॉ. किरण देशमुख, पनवेल महापालिकेच्या घनकचरा व आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना उपायुक्त कैलास गावडे यांनी या अभियानांतर्गत भूमी, जल, वायू, आकाश, अग्नि या पाच पंचतत्वांना विकसित करणे, त्यांचे संरक्षण करण्यावरती भर देण्यात येतो. भविष्यात हा कार्यक्रम संपुर्ण देशभरात राबविला जाऊ शकतो. पनवेल महापालिकादेखील या पंचतत्वातील प्रत्येक तत्वाचा विकास करण्यावरती भर देत असल्याचे सांगितले. या वेळी पिल्लई महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सेंसर बेस डस्टबीनचे माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणाची शपथ घेतली.

#### वसुंधरा संवर्धन विषयावर कार्यशाळा

***पनवेल महापालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत २२ ते २८ एप्रिलदरम्यान 'अर्थ आठवडा' साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. नुकतेच लोकनेते दि. बा. पाटील शाळेमध्ये वसुंधरेचे संवर्धन या विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वेळी विद्यार्थ्यांना वसुंधरेचे संवर्धन करताना निसर्गातील पंचतत्वाचे रक्षण करणे व त्याचे महत्त्व सांगण्यात आले.***

## शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुखपदी रामदास शेवाळे यांची नियुक्ती

**पनवेल : वार्ताहर**

शिवसेना नेते रामदास शेवाळे यांची पनवेल जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली असून तशा आशयाचे पत्र त्यांना देण्यात आले आहे.

रामदास शेवाळे यांच्या कार्याची दखल शिवसेना मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेवून त्यांच्या आदेशाने त्यांना पनवेल जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती जाहीर केली. नियुक्तीपत्र शिवसेना सचिव संजय मोरे व किरण पावस्कर यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी लातूर जिल्हा संपर्कप्रमुख ॲड.श्रीनिवास क्षीरसागर, अमित सर, कळंबोली शहरप्रमुख तुकाराम सरक, विजय जाधव, संजय शेडगे, आनंदा माने, नवनाथ वणवे, विराट पवार, सुधीर ठोंबरे, सुभाष घागडे, मदन वगरे, महेश गोडसे, राहूल मोरे, सिद्धेश म्हात्रे, प्रेम गोडसे, ओमकार बळीप आदी मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. या त्यांच्या नियुक्तीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



## 'निसर्ग मित्रां'सोबत उन्हाळी शिबिराचा आनंद

**पनवेल : प्रतिनिधी**

'निसर्ग मित्र' संस्था गेल्या अनेक वर्षापासून पनवेलमध्ये पर्यावरणपूरक उपक्रम राबवित आहे. मुलांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण व्हावी या दृष्टीने गेल्या अनेक वर्षांपासून ही संस्था किशोरवयीन मुलांचे उन्हाळी शिबीर, हिवाळी शिबीर घेत असते. यावेळचे उन्हाळी शिबिर संस्थेने माणगाव येथील साने गुरूजी राष्ट्रीय स्मारकामध्ये चार दिवस घेतले.

निसर्ग मित्र संस्थेचे डॉ. आशिष ठाकूर, तेजस्वीनी गुर्जर, ऐश्वर्या पवार, धनंजय मदन, किशोर, म्हात्रे, पराग सरोदे, संस्थेचे आदी प्रतिनिधीच्या उपस्थितीत हे शिबिर घेण्यात आले. या शिबिरातील चार दिवसांमध्ये संस्थेच्या स्वयंसेवकांनी मुलांनी विस्मरणात गेलेले मैदानी खेळ, व्यायाम, ध्यान, पेंटिग, क्राफ्टच्या विविध वस्तू, करायला शिकले याच बरोबर तसेच साने गुरूजी राष्ट्रीय स्मारकामधील सानेगुरूजी भवनातील जन्मापासून मृत्यूपर्यंत असलेले त्यांच्या आयुष्यातील विविध प्रसंग असलेले प्रदर्शन दाखविण्यात आले.

वसुंधरा दिनानिमित्त परिसरातील बहावा, असणा, शिरीष अशा विविध झाडांच्या बिया गोळा करून त्यांचे सुमारे २०० सीड बॉल्स करून ते आजूबाजूच्या जंगलामधील मातीत रोवण्यात आले. बैलगाडीची सफर ग्रामीण जीवनशैलीची ओळख करून देणारी ठरली. शेवटच्या दिवशी मुलांनी कमांडर ट्रेनिंगमधील विविध प्रकार शिकविण्यात आले. एकीची भावना मुलांमध्ये निर्माण करण्यासाठी ट्रेझर हंट सारखे खेळ गट बनवून खेळायला लावले. निसर्गमित्रचे हे उन्हाळी शिबीर मुलांसाठी अविस्मरणीय आठवणी देऊन गेले.

> **पालक मुलांना समाजात जगतानाचे सगळे अनुभव देऊ शकत नसते, परंतू निसर्ग मित्र परिवाराने घेतलेल्या या शिबीरामुळे मुलांच्या एकुणच सर्वांगीण विकासामध्ये खूप हातभार लागला आहे. शिबिरातील अनुभव मुलांना विविध प्रकारची शिकवण देणारे ठरले.**
>
> **-वर्षा कुलकर्णी**

## कोपर शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जि. प.च्या पनवेल तालुक्यातील कोपर येथील प्राथमिक शाळेत शुक्रवारी (दि. २८) विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची पटनोंदणी करण्यात आली तसेच नवीन दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत केले गेले. त्यामुळे विद्यार्थी आनंदले.

या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांनी सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. या मेळाव्याचे उद्घाटन शाळेचे चेअरमन अनंताशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. मेळाव्यास बी. टी. कांबळे, पंढरीनाथ घरत, इंदू म्हात्रे, अनसूया घरत, आनंदी घरत व पालक उपस्थित होते.

## कोल्हटकर यांना सन्मान जाहीर



**पनवेल :** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल, मुंब्रा पोलीस ठाणे येथे कर्तव्य बजाविणारे व त्यात उल्लेखनीय काम करणारे निवृत्ती बापुराव कोल्हटकर यांना महाराष्ट्र शासनातर्फे नुकतेच पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक १ मे २०२३ महाराष्ट्र दिनानिमित्त प्रदान करण्यात येणार आहे. कोल्हटकर यांच्या कामगिरींची दखल घेत महाराष्ट्र शासनाने पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक जाहीर केले आहे.

## मयत महिलेच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** रेल्वेमध्ये एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आल्याने तिच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस घेत आहेत.

बेलापूर रेल्वे स्टेशन फलाट क्रमांक २ वर उभ्या असलेल्या लोकल गाडीच्या डब्यात एक मयत महिला आढळून आली असून या महिलेचे वय अंदाजे ३५ वर्षे, उंची पाच फूट, बांधा सडपातळ, रंग सावळा, नाक बसके आहे. तसेच अंगात केशरी टॉप, निळी लेगीज घातलेली आहे. या महिलाबाबत कोणास अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२२७४६७१२२) अथवा सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित कणसे (९६०७६१४८७६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# बारसुतील चिथावणी

स्वतःचे सरकार असताना प्रकल्प उभारण्यासाठी आग्रही राहायचे आणि सत्ता गेल्यानंतर मात्र त्याच प्रकल्पाच्या विरोधात बोंब ठोकायची हा उद्धव ठाकरे गटाचा दुटप्पीपणा बारसू प्रकल्पाच्या निमित्ताने एव्हाना उघड झाला आहे. आता या प्रकल्पाविरोधात स्थानिकांना भडकविण्याचे काम त्यांच्याकडून सुरू आहे. त्यामुळे बारसूतील परिस्थिती सध्या बिघडत असल्याचे चित्र आहे.

**कोकणातील रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यातील नाणार येथील रिफायनरी प्रकल्प आता बारसू येथे उभारला जातोय. नाणार येथे या प्रकल्पाला तेव्हाच्या शिवसेनेचा व आताच्या ठाकरे गटाचा विरोध होता. नाणार येथून हा नियोजित प्रकल्प बारसू येथे स्थलांतरित झाल्यानंतर राज्यातील राजकीय चित्र बदलले. सत्ताधारी महाविकास आघाडीचे तत्कालीन मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून बारसू येथील प्रकल्प सुरू करण्याची मागणी केली. १२ जानेवारी २०२२ रोजी ठाकरे यांनी हे पत्र पंतप्रधान मोदींना पाठविले होते. सत्तेत असताना विकासासाठी या प्रकल्पाचे समर्थन करणाऱ्या ठाकरे गटाने सत्ता गेल्यानंतर मात्र पूर्वीप्रमाणे विरोधाचा सूर आळवला आहे. खरेतर हा हरित प्रकल्प असल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही. मुख्य म्हणजे जेथे हा प्रकल्प साकारला जाणार आहे तेथील जमिनीवर घरे, मानवी वस्ती अथवा झाडे नाहीत. त्यामुळे पर्यावरणाच्या नुकसानीचा प्रश्नच उद्भवत नाही. उलट हा प्रकल्प कोकणासह महाराष्ट्राच्या विकासाला चालना देणारा ठरणार आहे. कोकणी माणूस रोजगारासाठी बाहेरगावी खासकरून मुंबईत जाऊन राहतो. बारसू येथील रिफायनरी प्रकल्पामुळे लाखो रोजगार तिथे निर्माण होणार आहेत. शिवाय अन्य रोजगार, उद्योगाच्या संधी उपलब्ध होतील. म्हणूनच शिंदे-फडणवीस सरकार या प्रकल्पासाठी आग्रही असून माती सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे, मात्र हा प्रकल्प उभा राहून यशस्वी झाल्यास सत्ताधाऱ्यांना त्याचे श्रेय मिळेल या भीतीने विरोधकांनी विशेषत: ठाकरे गटाने विरोध दर्शविला आहे. असे असले तरी सरकार आपल्या निर्णयावर ठाम आहे. कोणत्याही परिस्थितीत प्रकल्प बारसूत उभारणारच, असा निर्धार शिवसेना-भाजपच्या नेत्यांनी केला आहे. ते पाहता आता ठाकरे गटाने स्थानिकांची दिशाभूल करून त्यांना चिथावणी देण्यास सुरुवात केली आहे. दोनच दिवसांपूर्वी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत बारसूचा दौरा करून आले. त्यानंतर त्यांनी नेहमीप्रमाणे पराचा कावळा करण्यास सुरुवात केली आहे. वास्तविक सरकार स्थानिकांशी चर्चा करण्यासही तयार आहे. त्यांच्या ज्या काही शंका, समस्या असतील त्या सोडवू, असे सरकारने म्हटले आहे. असे असताना उगाच लोकांची माथी भडकवण्यात काय मतलब. यात विरोधी पक्षांचा काय फायदा होईल ते त्यांनाच माहीत, पण ते सर्वसामान्य लोकांचे नुकसान करताहेत एवढे मात्र नक्की. उल्लेखनीय बाब म्हणजे स्थानिक आमदार राजन साळवी यांचे प्रकल्पाला समर्थन आहे. त्यांनाही विकास हवाय असे दिसते. अन्य मंडळी मात्र आंदोलनाला खतपाणी घालून वातावरण बिघडवित आहेत, पण राजकीय विरोधकांचे हे मनसुबे सरकार यशस्वी होऊ देणार नाही. स्थानिकांशी चर्चा करून एक चांगला प्रकल्प मार्गी लावण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. त्यामुळे आता तरी विरोधकांनी खोडा घालणे बंद करावे; अन्यथा जनताच त्यांना माफ करणार नाही.**

# रायगड जिल्ह्यात मियावाकी पद्धतीला पसंती



**कमी जागेत देशी व स्थानिक झाडांच्या लागवडीतून मानवनिर्मित घनदाट जंगलांची निर्मिती**

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

कमी जागेत देशी व स्थानिक झाडांची लागवडीतून घनदाट मानवनिर्मित जंगलांच्या निर्मितीसाठी अनेक पर्यावरण प्रेमी व विकासक रायगड जिल्ह्यात प्रयत्नशील आहेत. यासाठी मियावाकी पद्धतीचा अवलंबदेखील केला जात आहे. यामुळे पशुपक्षांना अन्न व निवारा मिळत आहे. जैवविविधता बहरते, शिवाय पर्यावरण संवर्धनसुद्धा होते.

सुधागड तालुक्यातील कुंभारघर येथील राजीव खन्ना यांनी आपल्या शेतातील जागेवर नुकतेच मियावाकी पद्धतीचा वापर करून अशा प्रकारे स्थानिक व देशी वृक्ष लागवड करून जंगल तयार केले आहे. जवळपास ३० गुंठ्यामध्ये ३००० झाडे लावली आहेत. सुधागड तालुक्यातील वनस्पती अभ्यासक, बाग निर्माते व ही पद्धत वापरणारे अमित निंबाळकर यांनी सांगितले की, जपान येथील वनस्पती तज्ञ प्रा. मियावाकी यांनी या पद्धतीचा आविष्कार केला. मानवनिर्मित जंगल पद्धतीला मियावाकी पद्धत म्हणतात. यामध्ये परिसंस्था अभियांत्रिकेद्वारे कमीत कमी जागेत जास्तीत जास्त देशी व स्थानिक वृक्षांची लागवड केली जाते. या तंत्रज्ञानात निसर्गाबरोबरच विज्ञानही आढळते म्हणूनच प्रा. मियावाकी म्हणतात 'ही निसर्ग आणि विज्ञानाची शुद्ध मैत्री आहे'. मियावाकी जंगल हे घरांच्या मागे, मंदिर परिसर, शाळा, महाविद्यालये, उदयोगसमूहांच्या जागा तसेच रस्त्यांच्या दुतर्फासुद्धा करता येते. ही एक निसर्ग प्रयोगशाळाच आहे. ज्यामध्ये देशी वृक्षांची ओळख विद्यार्थ्यांना होते. त्याचबरोबर वृक्ष संवर्धन आणि संरक्षणाचे धडेही त्यांना मिळतात.

दाट जंगल फार कमी राहिलेत त्यामुळे पशुपक्षी जास्त फिरकत नाहीत आणि जमिनीची धूप वाढली आहे. मियावाकी लागवड पद्धत एकदम सोपी असल्याने तशी लागवड करण्याचा निर्णय घेतला, असे सुधागडच्या कुभाघर येथील विकसक राजीव खन्ना यांनी सांगितले. तर जिल्ह्यात काही जण आपल्या परसात, शेतातील मोकळ्या जागेत, माळावर या पद्धतीचा अवलंब करत आहेत. पर्यावरण संवर्धन व जैवविविधता टिकविण्यासाठी व मृदा संवर्धनासाठी या पद्धतीचे अनेक फायदे आहेत. त्यामुळे अनेकांना या पद्धतीचा वापर करण्याचा सल्ला देतो. व करून सुद्धा देतो, असे पाली येथील वनस्पती व बागकाम तज्ज्ञ अमित निंबाळकर यांनी सांगितले.

### कमी जागेत अनेक वृक्ष

**साधारण एक हजार चौरस फूट जागेत २५० मोठे, उंच, मध्यम आणि लहान अशा चार प्रकारच्या ४० पेक्षाही जास्त देशी, पण दुर्मीळ वृक्षांची योग्य अंतरावर लागवड केली जाते. ज्यामध्ये कोणत्याही वृक्ष गटांचे वर्चस्व आढळत नाही. सर्व आपआपसात स्पर्धा न करता समान पातळीवर वाढताना आढळतात.**

### स्वदेशी स्थानिक वृक्षांना स्थान

**वृक्ष लागवडीत त्यांचे कूळ, जाती, प्रजातीची त्यांचे आपआपसातील अंतर आणि जमिनीखालून होणारी मूलद्रव्यांची देवाणघेवाण यास जास्त महत्त्व असते मियावाकी पद्धतीत विदेशी वृक्षांना स्थान नसते. तर स्थानिक वृक्ष वापरले जातात. सर्व तंत्रज्ञान जमिनीखालील उपयोगी जिवाणू, खेळती हवा, शेणखत आणि भाताच्या तुसावर अवलंबून असते.**

### सेंद्रिय घटकांचा वापर

**या तंत्रज्ञानात स्थानिक जागेवरील मूळ माती तीन फूट खोल खड्डा करून काढली जाते आणि पुन्हा तेथील चाळलेली माती, खत आणि भाताचे तूस यांचे मिश्रण करून भरली जाते. ही संपूर्ण जैविक पद्धती असून येथे सेंद्रिय घटकांचाच वापर होतो. रासायनिक खते, कीटकनाशकापासून हे तंत्रज्ञान मुक्त असते. मियावाकीस योग्य कुंपण घालून पहिली दोन वर्षे सांभाळल्यास तिसऱ्या वर्षी ही उद्याने स्वतंत्र आणि स्थिर होतात.**





## बदलते तंत्रज्ञान

# उन्हाळ्यामध्ये 'या' ट्रीक्स वापरून फोन ठेवा कूल




भारतामध्ये कडक उन्हाळा असतो. कडक उन्हाचा प्रभाव आपल्या शरीरावर होत असतो. उन्हाळ्यात आपल्या दैनंदिन वापरातील मोबाईल फोनदेखील तापू शकतो. कधी-कधी स्मार्टफोन फुटण्याची शक्यता असते. फोन तापून फुटू नये यासाठी काही ट्रिक्सची मदत घेता येते.

**फोन केस वापरा** : स्मार्टफोनची बॅटरी खूप नाजूक असते. उष्णतेमुळे फोन तापल्यावर बॅटरीदेखील गरम होऊ शकते. अशा वेळी स्मार्टफोन फोन केसमध्ये ठेवणे योग्य मानले जाते. यामुळे फोन आणि त्यातील बॅटरी दोन्ही तापत नाही.

**उन्हामध्ये ठेवू नका** : स्मार्टफोनसाठी ३२-९५ डिग्री फॅरेनहाइट तापमान योग्य मानले जाते. कडक उन्हामध्ये ठेवल्याने त्याचे तापमान वाढून स्फोट होऊ शकतो. शक्य तितक्या थंड वातावरणामध्ये फोन ठेवावा.

**चार्जिंग करताना फोन झाकू नका** : अंथरुणासारख्या जागी चार्जला लावल्याने आसपासच्या गरम वातावरणामुळे फोन तापू शकतो. फोन चार्ज करताना तो सपाट पृष्ठभागावर ठेवावा, जेणेकरुन त्याचे तापमान नियंत्रणात राहील, तसेच चार्जिंग होत असताना फोन वापरणे टाळा.

**बॅटरी हायजिनकडे लक्ष द्या** : स्मार्टफोनसंबंधित बॅटरी हायजिन हा प्रकार फार महत्त्वपूर्ण असतो. यानुसार ३०-८० टक्के बॅटरी असताना फोन चार्जला लावावा. १०० टक्के होण्याआधीच चार्जिंग बंद करावे.

**योग्य चार्जरचा वापर करा** : फोन खरेदी करताना त्याच्यासह चार्जरदेखील दिला जातो. त्यामुळे कंपनीने दिलेल्या चार्जरचा वापर करावा. एकच चार्जर वापरणे नेहमी फायदेशीर असते. सतत चार्जर बदलल्याने स्मार्टफोनची बॅटरी खराब होऊ शकतो. यामुळे फोन तापूदेखील शकतो.

**गरजेपेक्षा जास्त डेटा स्टोअर करू नका** : प्रत्येक स्मार्टफोनमध्ये ठराविक प्रमाणात स्टोरेज असते. त्याच्याच गरजेपेक्षा जास्त डेटा भरल्याने फोनवर ताण येऊ शकतो. त्यात उन्हामुळे फोन तापू शकतो. या दोन्ही गोष्टीमुळे मोबाईलवर ताण आल्याने तो फुटू शकतो.

# ...म्हणून साजरा होतो जागतिक नृत्य दिन



## निमित्त

नृत्य हे एक असं माध्यम आहे ज्याद्वारे लोक त्यांच्या मनातल्या भावना व्यक्त करतात. UNESCO ने २९ एप्रिल १९८२ रोजी जगाची खास शैली एका खास दिवसाद्वारे साजरी करण्याचा निर्णय घेतला होता. नृत्य सुधारक, महान नर्तक जीन-जॉर्जेस नवरे यांच्या स्मरणार्थ हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस सुरू करण्यामागचे कारण म्हणजे लोकांना त्याच्या कला गुणांची जाणीव करून देणे.

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ड्रामाने १९८२ मध्ये आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. आयटीआय ही युनेस्कोच्या परफॉर्मिंग आर्ट्सची भागीदार होती. त्याच वेळी,डान्स डे साजरा करण्यासाठी २९ एप्रिल हाच दिवस का निवडला गेला, याबद्दल जर आपण इतिसाहात डोकावून पाहिलं तर २९ एप्रिल रोजी आंतरराष्ट्रीय नृत्य दिन, आधुनिक बॅलेचे निर्माते जीन-जॉर्जेस नोव्रे यांच्या सन्मानार्थ आयटीआयने हा दिवस निवडला.

या दिवशी म्हणजेच २९ एप्रिल रोजी जीन जॉर्जेस नोव्हरे यांचा वाढदिवस आहे. अशावेळी त्यांच्या जयंतीनिमित्त नृत्य कलेला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस जगभरात साजरा केला जातो. या दिवशी लोक आपले नृत्य कौशल्य जगासमोर ठेवतात. हा दिवस साजरा करण्याचा उद्देश नृत्याच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन आणि नृत्य कार्यक्रमांमध्ये सहभाग वाढवणे, असे मानले जाते.

जॉर्जेस हा एक फ्रेंच डान्सर होता जो नृत्यनाटिकेत निपुण होता. त्यांनी त्यांच्या पुस्तकात नृत्यातील अनेक बारकावे लिहिले आहेत. याशिवाय यांनी लेट्स मीट द बॅलेट नावाचे आणखी एक पुस्तक लिहिले. भारतात प्राचीन काळापासून नृत्याचे अनेक प्रकार प्रचलित आहेत. भगवान शिवानेही तांडव सादर केले जे नृत्याचा एक प्रकार बनले.

भारताच्या कानाकोपऱ्यात अनेक लोकनृत्ये प्रचलित आहेत. ज्यामध्ये भरतनाट्यम, कुचीपुडी, मोहिनीअट्टम, कथक, कथकली, बिहू, छाऊ असे काही लोकप्रिय नृत्य प्रकार आहेत. या नृत्यांना लोकप्रिय करण्याचे श्रेय काही लोकप्रिय नर्तकांना (डान्सर) जातं, ज्यांनी जगभरात नृत्याचे काही प्रकार पोहोचवले. दरवर्षी २९ एप्रिल रोजी आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस जागतिक पातळीवर साजरा केला जातो. एक महान डान्सर जीन जॉर्जेस नवारे हिच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांची आठवण म्हणुन हा दिवस दरवर्षी संपुर्ण जगभरात साजरा केला जातो. २९ एप्रिल १९८२ रोजी युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय थिएटर संस्था ह्या आंतरराष्ट्रीय नृत्य समितीने २९ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जाईल असे घोषित केले होते. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो आहे.

नृत्य हा आपल्या भारतीय संस्कृतीचा खुप महत्वाचा भाग मानले जाते याचसोबत आपल्या भारतीय संस्कृतीत खुप महत्व देण्यात आले आहे. नृत्य हे एक अभिव्यक्त होण्याचे मनोरंजनाचे एक उत्तम साधन आहे. याचसोबत आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे देखील महत्वाचे माध्यम नृत्य आहे. आज नृत्याच्या माध्यमातून समाजात जनजागृतीचे कार्य देखील केले जाते आहे.

नृत्य कलेला अणि नृत्य करणारया कलावंतांना संपूर्ण जगभरात मान्यता प्राप्त व्हावी जगभरात नृत्य कलेचा प्रचार प्रसार व्हावा. नृत्य कलेला प्रोत्साहन देणे हे आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा करण्याचे उद्दिष्ट आहे. नृत्य कलेस राजाश्रय प्राप्त व्हावा नृत्याकडे सर्वांचे लक्ष वेधले जावे समाजात जागृती निर्माण व्हावी यासाठी हा दिवस दरवर्षी आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा केला जातो.

संपूर्ण जगभरात नृत्य कलेला प्रोत्साहन प्राप्त करून देण्यासाठी लोकांचे नृत्य कलेला प्रोत्साहन मिळावे म्हणून नृत्यात करिअर करण्यासाठी संधी प्राप्त करून देणे नृत्याचे प्रकार संपूर्ण देशभरात पोहचवणे हयासाठी युनेस्कोने हा आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा करायचे ठरवले होते.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!




**माथेरान : उन्हाळी सुट्या सुरू झाल्याने निसर्गरम्य व थंड हवेचे ठिकाण माथेरानमध्ये पर्यटन हंगामास सुरुवात झाली आहे. त्यामुळे स्थानिक रोजगारालाही चालना मिळू लागली आहे. पर्यटक मिनीट्रेनमधून प्रवास करून रानमेव्याचाही आस्वाद घेत आहेत.**

## आरोग्य प्रहर

# 'असे' घालवा घामामुळे मानेवर येणारे काळे डाग

उन्हाळा येताच त्वचेशी संबंधित समस्या उद्भवू लागतात. टॅनिंगसह इतर अनेक समस्या उष्णतेमुळे वर तोंड काढतात. खरं तर उन्हाळ्यात खूप घाम येतो आणि हा घाम सुकल्यावर मानेवर घाण साचते आणि त्यामुळे मान दुरून काळी दिसते.



अनेकजण यासाठी वेगवेगळी अनेक प्रकारची उत्पादने वापरतात, मात्र ही उत्पादने तुमच्या त्वचेला हानी पोहचवू शकतात. अशा परिस्थितीत मान स्वच्छ करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपाय करून पाहू शकता. चला जाणून घेऊया उन्हाळ्यात घामामुळे मानेवरील काळे डाग घालवण्यासाठी काय करावे.

**बेकिंग सोडा, लिंबू** : बेकिंग सोडा, लिंबू आणि नारळाचे तेल मिसळून तयार केलेली पेस्ट लावल्याने काळ्या मानेची समस्या दूर होईल, मात्र मानेवर किंवा त्याच्या जवळपासच्या त्वचेवर जखम असल्यास बेकिंग सोडा लावू नये अन्यथा त्याचा त्रास होऊ शकतो. एका बाऊलमध्ये एक चमचा बेकिंग सोडा घ्या. त्यात अर्धा चमचा दही मिसळून पेस्ट तयार करा. दह्यात लॅक्टिक ॲसिड असते, ज्याने त्वचा उजळण्यात मदत मिळते. दह्याऐवजी पाणीही वापरू शकता.

**सायडर व्हिनेगर** : ॲपल सायडर व्हिनेगरमुळेही मानेचा काळेपणा कमी होतो. तुम्हाला फक्त दोन चमचे ॲपल सायडर व्हिनेगर घ्यायचे आहे आणि ते चार चमचे पाण्यात चांगले मिसळायचे आहे. नंतर कापसाच्या साहाय्याने मानेच्या काळेपणावर लावा, १० मिनिटांनी धुवा. त्याचा परिणाम लवकरच दिसून येईल.

**बटाट्याचा रस** : बटाट्याचा रसदेखील मानेभोवतीची काळी वर्तुळे कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. यात ब्लिचिंग गुणधर्म आहेत ज्यामुळे मानेची त्वचा चमकदार होते. हे करण्यासाठी, तुम्हाला बटाटा किसून घ्यावा लागेल, नंतर त्याचा रस पिळून घ्या आणि कापसाच्या साहाय्याने गळ्याभोवती लावा. असे काही दिवस केल्याने मानेवरील काळेपणा नक्कीच दूर होईल.

**बेसन आणि हळद** : मानेचा काळेपणा दूर करण्यासाठी दोन चमचे बेसनामध्ये एक चमचा हळद, अर्धा चमचा लिंबाचा रस आणि गुलाबपाणी मिसळा. ही पेस्ट नीट मिसळा आणि नंतर मानेवर लावा. ही पेस्ट मानेवर १५ मिनिटे राहू द्या. १५ मिनिटांनंतर कोमट पाण्याने मान धुवा. ही पेस्ट आठवड्यातून दोनदा लावल्याने मानेचा काळपटपणा दूर होईल.

## निवडक

### महाडमध्ये सुरक्षा साधनांचे वाटप



**महाड :** महाड नगरपालिकेतील अग्निशामक दलाला अत्यंत महत्त्वाचे असे अत्यावश्यक व सुरक्षा साधनांचे वाटप एम.एम.ए सी.ई.टी.पी मार्फत २६ एप्रिल रोजी करण्यात आले. महाड नगरपालीकेच्या वतीने वाटप करण्यात आलेल्या साधनांमध्ये आगीपासून बचाव करण्यासाठी असलेले दोन सूट, हेल्मेट, हातमोजे सेफ्टी बेल्ट, सेफ्टी शूज तसेच इतर अनेक अत्यावश्यक अश्या साधनांचा समावेश आहे. या साधनांचे वाटप महाड नगरपालिकेमध्ये करण्यात आले. यावेळी महाड नगरपालिकेचे मुख्याधिकारी महादेव रोडगे, अशोक तलाठी (उपाध्यक्ष एम.एम.ए – सी.ई.टी.पी), तुषार भोसले, निखिल भोसले, गणेश पाटील, गोविंद साळुंखे तसेच इतर अग्निशामक दलातील अधिकारी उपस्थित होते.

### रघुनाथ भागवत यांना 'जीवनगौरव'

**महाड :** जगभरातील साळी जनांची लोकप्रिय व विश्वसनीय सामाजिक संस्था श्री जिव्हेश्वर प्रतिष्ठान पुणे या संस्थेमार्फत दरवर्षी दिला जाणारा माधवराव गोविंदराव साळी स्मृती पत्रकार जीवनगौरव पुरस्कार पुरस्कार महाड येथील पत्रकार रघुनाथ भागवत यांना पुणे येथे ज्येष्ठ कामगार नेते तथा समाजसेवक श्रीकृष्ण फडणवीस (पुणे) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, सचिव रोहित पाटील, खजिनदार राजेंद्र जैतपाल, ज्येष्ठ पत्रकार गोपाळ कांबळे, श्रीकांत सहस्त्रबुद्धे, उदय सावंत, निलेश लोखंडे, नितेश लोखंडे तसेच शैलेश पालकर यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.



# मोर्बा रस्त्यावर बर्निंग कारचा थरार

## ■ सुदैवाने जीवितहानी टळली ■ महामार्गावरील घटना ■ प्रवासी सुखरूप

**माणगांव : रामप्रहर वृत्त**

माणगांव तालुक्यातुन जाणाऱ्या पुणे दिघी महामार्ग (मोर्बा रोडवर) २६ एप्रिल रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास घडली. या घटनेमध्ये श्रीवर्धन–म्हसळा–मोर्बा बाजूकडून माणगांव बाजूकडे येणारी आय ट्वेन्टी सीएनजी कारने माणगांव मोर्बा हद्दीत रनिंगमध्ये अचानक पेट घेतला. या बर्निंग कारचा थरार माणगांव मोर्बा रोडवर प्रवास करणाऱ्या अनेक नागरीकांनी पहिला व थक्क झाले.मात्र या अपघातात कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही. आय ट्वेन्टी कारमध्ये प्रवास करणारे दोन्ही प्रवासी सुखरूप बचावले आहेत.

माणगांव तालुक्यातील जाणारे दोन मुख्य महामार्ग ते म्हणजे एक मुंबई गोवा महामार्ग आणि दुसरा म्हणजे पुणे–दिघी



महामार्ग या दोनही महामार्गांचे काम अगदी युद्ध पातळीवर सुरू आहे. कोकणातील रस्ते म्हणा किंवा आणखी कुठल्याही प्रकारचा मार्ग असो कोकणाला जोडण्यासाठी डोंगर फोडा, पूल बांधा अश्या समस्या नेहमी समोर येत असतात त्यामुळे कोकणातील रस्ते घाट आणि वळणाचे आहेत. या रस्त्यावर अनेक दुर्दैवी घटना घडत असतात त्यामध्ये कोण बचावतो तर कुणाचा नाहक जीव जातो. यामुळे कोकणातील रस्त्यावर नेमक्या कोणत्या इंधनाची वाहने वापरावीत असा प्रश्न सध्या कोकणात प्रवास करणारे पर्यटक व नोकरदार वर्ग यांना पडला आहे.

महामार्गावर अशा घटना माणगांव तालुक्यात वारंवार घडत असतात मात्र माणगांव तालुक्यात माणगांव नगरपंचायत सध्या उपलब्ध असलेले क्यूआरव्ही क्विक रिस्पॉन्स वेहीकल म्हणजे तात्काळ आपत्ती निवारण करण्याकरिता दाखल होणारे वाहन व टीम ही नेहमीच दक्ष असल्याने यावेळी देखील क्यूआरव्ही वाहन व दक्ष वाहन चालक दशरथ गावडे व संपूर्ण माणगांव नगरपंचायत टीम दाखल झाली, मात्र तत्पूर्वी शेजारील सुजाण माणगांवकर नागरिक व व्यापारी यांनी ही पेटती कार आटोक्यात आणली आणि मोठा अनर्थ टळला.

# मोहोपाड्यातील बाईकस्वार अपघातात गंभीर जखमी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खंडाळा येथून मोहोपाडा रसायनी येथे जाणारा युवक मोटरसायकलवरून सायमाळ येथे गुरुवारी रात्री आले असता त्यांचा मोटारसायकलवरील ताबा सुटला आणि ते रस्त्याशेजारील बॅरीकेडला धडकून खड्‌ड्यात पडले.

या अपघाताची माहिती अपघातग्रस्त टीमला समजताच अपघातग्रस्त टीमचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले.या अपघातात मोहोपाडा नविन पोसरी बुध्दविहार येथील विशाल तायडे आणि त्याचा मित्र होता दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलात दाखल करण्यात आले आहे.

या वेळी टीमचे भक्ती साठेलकर, अंकुश मोरे, विशाल चव्हाण, संकेत पाटील, विवेक रावळ, चिराग रावळ, मोहन जाधव, पंकज बागुल, कृणाल पाटील, धर्मा पाटील तसेच खोपोलीतील काही युवकांनी देखील मोलाची मदत केली.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

**मौजे–केवाळे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.**

| भुमापन नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर..पॉ. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| २६/३ | ०–०९–१० | १.२८ | श्री. बापूराव तुकाराम केदार |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २६/०४/२०२३.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१


# रोहा नगर परिषदेच्या शाळांमध्ये गुणवत्ता विकास कार्यक्रम

## शिक्षकांसह विद्यार्थ्यांनाही फायदा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या गुणवत्ता विकास कार्यक्रमाचा फायदा शिक्षकांसह विद्यार्थ्यांना झाला आहे.

कोरोनाकाळात झालेले अध्ययन अध्यापनाचे प्रचंड नुकसान झाले होते. त्यामुळे सध्यस्थितीचा विचार करता अध्यापन करत असताना अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवाहाबरोबर आणणे नक्कीच आव्हानात्मक होते. जानेवारी २०२३ मध्ये रोहा नगरपरिषदेच्या शाळांतील शिक्षकांसाठी प्रथम एज्युकेशनमार्फत गुणवत्ता विकास कार्यक्रम २ ते ५ असे दोन टप्प्यांत हे प्रशिक्षण शिक्षकांनी पूर्ण केले.

या प्रशिक्षणाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये प्रात्यक्षिकांवर अधिक भर होता. साध्या सोप्या परंतु मनोरंजक खेळांच्या माध्यमातून भाषेची मूलभूत वाचन व लेखन कौशल्ये, मूलभूत गणितीय कौशल्ये विद्यार्थ्यांना कशी आत्मसात करता येतील याचे प्रभावी मार्गदर्शन 'प्रथम'च्या कुशल प्रशिक्षकांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवले.

प्रशिक्षणानंतर शालेय अध्यापनात रोहा नगर परिषदेच्या ८ शाळा प्रभावीपणे या कृत्यांचा वापर करत अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रयत्नपूर्वक प्रवाहात आणण्यात यशस्वी ठरल्या. दरम्यानच्या काळात 'प्रथम' च्या प्रशिक्षकानी वेळोवेळी शाळेस भेट दिली. त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांशी संवाद साधत टेबलाजवळ बोलावून त्याचे परीक्षण केले. पूर्वचाचणीतून मागे असणारे विद्यार्थी शोधून त्यांना प्रवाहात आणण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले. 'प्रथम' च्या प्रशिक्षकांनी उत्तरचाचणीच्या माध्यमातून पुन्हा प्रत्येक विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारले व नगर परिषदेच्या सर्व शाळेत प्रात्यक्षिक कार्यक्रम यशस्वी झाल्याची खात्री केली.

# ओव्हरलोड माती ट्रकने लौजी ग्रामस्थ हैराण

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लौजी या गावाच्या परिसरातून मोठ्या प्रमाणात मातीची अवैधरित्या मातीची वाहतूक करण्यात येत आहे. या मातीची रॉयल्टी भरली की नाही? याबाबत ग्रामस्थांमध्ये चर्चा आहे. महसूल कर्मचारी व माती माफिया यांच्यात साठेलोटे असल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

माती भरून ट्रक गावातून जात असल्याने, ओव्हरलोड माती भरल्याने ती खाली पडून रस्त्यालगतच्या घरांमध्ये जात असल्याने ग्रामस्थांमध्ये आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

ओवरलोड वाहतुकीमुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिक पोलिसांनी याकडे लक्ष द्यावे अशी मागणी ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे. अनेकदा शासकीय कार्यालय रविवारी बंद असल्याने त्याच दिवशी प्रचंड प्रमाणात मातीची वाहतूक करण्यात येत असते. याबाबत स्थानिक महसूल कर्मचारी यांना विचारणा केली असता मार्चच्या अगोदरच ठेकेदाराने आगाऊ रक्कम भरल्याचे सांगितल्याने मोठ्या प्रमाणात याबाबत शंका निर्माण होत आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे– **उलवे** ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या भुखंडाचे भाडेपट्टा मालकीहक्क धारक **मे. हरिविहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित** यांनी सदर भुखंडामधील त्यांचे भाडेपट्टा मालकीहक्क त्रिपक्षीय कराराअन्वये कायमस्वरुपी आमचे अशिल **मे. प्रोग्रेसिव्ह होम्स तर्फे भागीदार श्री जिगर विनोद त्रिवेदी** यांचे लाभात हस्तांतरीत करण्याचे योजिले आहे.

**भुखंडाचे वर्णन**
**मौजे– उलवे, ता. पनवेल, जि.रायगड**

| भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौरस मीटर | नोड |
|---|---|---|---|
| १ | ३ | ५७०० | उलवे |

वर नमुद भुखंडास यापुढे सोयीसाठी 'सदर भुखंड' असे संबोधण्यात आलेले आहे.

सदर भूखंडास अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न, वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद भुखंडाचा त्रिपक्षीय करार व अनुशंगिक दस्त कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक २८/०४/२०२३
ठिकाण पनवेल

**सही/–**
**ॲड. शरद जाधव,** वकील
**संपर्कासाठी पत्ता–** तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भुखंड क्र. ११३, मिडल क्लास को. ऑप. हौ. सोसायटी, पनवेल – ४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड
मो.नं. ९८२०६३७१७५


# राज्याच्या उद्योग क्षेत्र वाढ मोजमापात योगदान द्यावे

## ■ अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संचालक विजय आहेर यांचे प्रतिपादन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या उद्योग क्षेत्र वाढ मोजमापात योगदान द्यावे, असे प्रतिपादन अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संचालक विजय आहेर यांनी केले. ते राज्यातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या तीन दिवशीय कार्यशाळेत बोलत होते.

वार्षिक उद्योग पाहणी हा उद्योग विषयक महत्वपूर्ण आकडेवारीचा प्रमुख स्त्रोत आहे. या आकडेवारीचा वापर राष्ट्रीय उत्पन्न अंदाज तयार करणासाठी, औद्योगिक संरचनेचा अभ्यास करण्यासाठी व उद्योगविषयक धोरणे निश्चितीसाठी होतो. राष्ट्रीय स्तरावर सांख्यिकी कार्यालयाकडून देशातील सर्व राज्यांमधील प्रमुख उद्योगांच्या वार्षिक उद्योग पाहणीचे काम करण्यात येते तर राज्यातील उद्योग पाहणीचे काम अर्थ व सांख्यिकी संचालनालय या राज्य शासनाच्या सांख्यिकी विषयक नोडल यंत्रणेकडून करण्यात येत आहे.

क्षेत्रकामातून संकलित करण्यात येणाऱ्या माहितीची गुणवता वाढविण्यासाठी व क्षेत्रकामाचा दर्जा उंचाविण्याच्या दृष्टीकोनातून २०२१–२२ या वर्षाच्या क्षेत्रकामासाठी राज्यातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांची तीन दिवशीय कार्यशाळा १९ ते २१ एप्रिल या कालावधीत नियोजन विभागाच्या अधिनस्त अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबईतर्फे यशदा, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महासंचालक, यशदा एस. चोकलिंगम, (भा.प्र.से.) व प्रमुख पाहूणे म्हणून उपमहानिदेशक, औद्योगिक सांख्यिकी विभाग, राष्ट्रीय साख्यिकी कार्यालय, कोलकाता सौम्या चक्रवर्ती, राष्ट्रीय नमूना पाहणी विभागाच्या पुणे येथील क्षेत्रीय कार्यालयाचे संचालक आलोक कुमार, उद्योग विभागाचे प्रतिनिधी, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे पी.डी.रेंदाळकर, संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय विजय आहेर उपस्थित होते.

सौम्या चक्रवर्ती उपमहानिदेशक राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांनी जगात बहुतांश देशामध्ये उद्योग वार्षिक उद्योग पाहणी घेण्यात येत असल्याचे सांगून आपल्या देशातील वार्षिक उद्योग पाहणीमध्ये सर्वात अधिक उद्योगाची पाहणी केली जात असल्याची अभिमानास्पद बाब नमूद केली व माहिती विहित वेळेत संकलित करून उपलब्ध करून देण्याचे महत्व अधोरेखित केले.

विजय आहेर म्हणाले, जरी मनुष्यबळाची कमतरता असली तरी कामाचे योग्य नियोजन करून शासनासाठी व उद्योग क्षेत्रासाठी महत्वाची असलेली माहिती या पाहणीच्या माध्यमातून वेळेत व गुणवत्तापूर्ण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच उद्योगांनी देखील याकामी आवश्यक ते सहकार्य करावे असे आवाहन केले.

राज्यातील प्रादेशिक सांख्यिकी कार्यालयांचे सिमा जोशी, सहसंचालक उपसंचालक वृषाली माकर आणि क्षेत्रकाम करणारे कर्मचारी कार्यशाळेत सहभागी झाले होते. प्रास्तविकात उपसंचालक अर्थ सख्यिकी संचालनालय दिपाली धावरे यांनी वार्षिक उद्योग पाहणीबाबत सर्व उपस्थितांना अवगत केले. सहसंचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांनी नवेन्दु फिरके, उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. समारोपासाठी उपमहानिदेशक, यशदा पुणे डॉ.मल्लीनाथ कलशेट्टी हे अध्यक्ष तर अपर संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय पुष्कर भगूरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# अतिरिक्त महासंचालक के. आर. सुरेश यांची मुरुड तटरक्षक दलास भेट



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड – जंजिरा येथील भारतीय तटरक्षक दलाच्या कार्यालयास प्रथमच तटरक्षक दलाचे अतिरिक्त महासंचालक के. आर. सुरेश, कोस्ट गार्ड कमांडर, वेस्टर्न सीबोर्ड, श्रीमती जयंती सुरेश कोस्ट गार्ड वेस्टर्न सी बोर्ड अध्यक्ष यांनी तटरक्षक दलाचे अधिकारी, नागरी कर्मचारी आणि कुटुंबांशी संवाद साधण्यासाठी जंजिरा येथे भेट दिली.

ध्वज अधिकाऱ्याने स्थानकाच्या परिचालन तयारीचा आणि चालू असलेल्या पायाभूत विकासाचा आढावा घेतला. ध्वज अधिकाऱ्याने याशिवाय दिघी बंदरावर तटरक्षक दलाच्या तुकड्यांना भेट देऊन समुद्रात केलेल्या कार्यात त्यांचे मनोबल वाढवले.

ध्वज अधिकाऱ्याने स्थानकाचे धोरणात्मक महत्त्व देखील प्रभावित केले आणि जागतिक वारसा स्थळ असलेल्या जंजिरा किल्ला आणि प्रख्यात पर्यटन स्थळ असलेल्या रायगड किनारपट्टीच्या सुरक्षेसाठी तटीय सुरक्षेमध्ये सहभागी असलेल्या सर्व भागधारकांसह तटरक्षक दलाने केलेल्या समक्रमित प्रयत्नांची प्रशंसा केली.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे कोयनावेळे, ता. पनवेल, जि, रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे/विकसन कराराद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन / भूखंडाचे वर्णन व विदयमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे :–

**जमिनीचे वर्णन**
**मौजे कोयनावेळे ता. पनवेल, जि. – रायगड**

| भोगवटादाराचे नाव | भूमापन /सर्व्हे क्र. | उपविभाग /गट क्र. | भूधारणा पध्दती | क्षेत्र हे . आर. पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) सौ. नेहा नरेश शिंदे उर्फ नेहा नरेंद्र शिंदे, २) श्री. राजेश वसंत कदम, ३) श्री. संतोष वसंत कदम | ६ | ३ | भोगवटादार वर्ग –१ | ०–७८–६० ला.ला<br>०–०३–३० पो.ख<br>०–८१ –९० एकूण | ६.२५ |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तसेच सदरहू विदयमान कब्जेदारांसोबत विकसन करार करणार आहेत.

तरी, वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही दान, गहाण, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासाहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

पनवेल,
दि. २९/०४/२०२३

**सही/–**
**(सतिश बाळाराम गवते)**
वकील.
**पत्ता :** ऑफिस नं. १४, यशोकिरण को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६, जि. रायगड.
फोन नं. ९१३७५००४५१.



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ०२/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक १२/०४/२०२३ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीताच्या ई निविदा संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. जलशुद्धिकरण केंद्राच्या परिसरातील विद्यमान दगडी बांधकाम असलेल्या कंपाऊंड वॉलची दुरुस्ती करणे व गॅबियन रिटेनिंग वॉल बांधणे. |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक दिनांक ०२/०५/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# नवी मुंबईत साकारतोय बहुउद्देशीय प्रकल्प

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर १२ येथील नवी मुंबई महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या बस स्थानक, वाणिज्य संकुल आणि आंतरक्रीडा संकुल तसेच ऑलिंपिक आकाराच्या जलतरण तलाव प्रकल्पाचा आज लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी पाहणी दौरा केला. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर नवी मुंबईसाठी तो मानाचा ठरेल तसेच नवी मुंबईकरांना नवीन आधुनिक सुविधा प्राप्त होतील असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले.

या प्रकल्पाची इमारत तळ अधिक आठ मजल्यांची आहे. १९१.९६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. नवी मुंबई शहर देशात राहण्यायोग्य शहरांच्या यादीत वरच्या क्रमांकावर आहे. इतर शहरातील नागरिक नवी मुंबई शहरामध्ये घर घेऊन राहण्यास इच्छुक असतात. याचे प्रमुख कारण म्हणजे नवी मुंबईमध्ये उपलब्ध असणाऱ्या मूलभूत आणि पायाभूत नागरी सुविधा असल्याचे नाईक यांनी सांगितले

वाशी सेक्टर १२मधील या प्रकल्पामध्ये तळमजल्यावर बांधण्यात येत असलेल्या प्रशस्त बस स्थानकामध्ये आठ बस थांबे आहेत. त्यामुळे येथून होणारी एमएमटीच्या बसेसची वाहतूक सुरळीत होणार आहे. नवी मुंबईच्या विविध भागात नागरिकांना प्रवास करता येणार आहे.



## ■ आमदार गणेश नाईक यांनी केला पाहणी दौरा

परिवहनच्या ताफ्यातील इलेक्ट्रिक बसची वाढती संख्या पाहता या ठिकाणी बसेस साठी इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनदेखील असणार आहे. नवी मुंबई मधून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार व्हावेत यासाठी क्रीडा सरावाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे धोरण आतापर्यंत लोकनेते नाईक यांनी राबवले आहे. या अंतर्गत त्यांनी केलेल्या सूचनेनुसार या प्रकल्पात तिसऱ्या मजल्यावर खेळण्याच्या सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत यामध्ये स्कॉश कोर्ट बांधण्यात येणार आहे. त्याचबरोबर योगा रूमदेखील असणार आहे. एक स्पोर्ट हॉल बांधण्यात येणार आहे.

नवी मुंबईमध्ये अनेक गुणवंत जलतरणपटू आहेत. या प्रकल्पातील चौथ्या मजल्यावर एक ऑलिम्पिक आकाराचा तरणतलाव बांधण्यात येणार आहे. या तलावाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नवी मुंबईतील जलतरणपटू आणि पोहण्यास इच्छुक नागरिकांना एक चांगली सुविधा महापालिकेच्या माध्यमातून नवी मुंबईमध्ये उपलब्ध होणार आहे.

माजी आमदार संदीप नाईक यांच्या कार्यकाळामध्ये या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली होती. संदीप नाईक यांनी महापालिका आणि शासकीय स्तरावर अनेक बैठका घेऊन या प्रकल्पाला गती दिली होती. कोरोनाच्या कालावधीमध्ये या प्रकल्पाचे काम काही अंशी थांबले होते, परंतु कोरोनाचा कहर कमी झाल्यानंतर नवी मुंबईकरांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या सुविधायुक्त प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी लोकनेते आमदार नाईक प्रयत्नशील आहेत.

नवी मुंबईकरांना सोयीसुविधा उपलब्ध करून देताना त्याचा भूर्दंड कर रूपाने जनतेवर पडणार नाही याची लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी सदैव काळजी घेतलेली आहे. त्यामुळे सुविधांच्या प्रकल्पांमधूनच त्याचा खर्चही निघावा, अशी त्यांची आजवरची भूमिका राहिलेली आहे. या प्रकल्पावर होणारा खर्च या प्रकल्पातील दुकाने आणि कार्यालय यामधून मिळणाऱ्या भाड्यामधून अंदाजे अकरा वर्षांमध्ये वसूल होणे अपेक्षित आहे.

### पार्किंगची समस्या लागणार मार्गी

**वाशी हे नवी मुंबईतील सर्वांत महत्त्वाचे ठिकाण असून या ठिकाणी अनेक व्यवसायिक, वाणिज्यिक शैक्षणिक आस्थापना आहेत. रहिवासीक्षेत्र विस्तारले आहे. मोठमोठी गृहसंकुले उभी राहत आहेत. त्यामुळे पार्किंगची समस्या भीषण बनली आहे. त्यावर तोडगा म्हणून या प्रकल्पामध्ये वाहनतळ निर्माण करण्याची सूचना लोकनेते आमदार नाईक यांनी केली होती. त्यानुसार सुमारे ३९८ चार चाकी वाहनांसाठी आणि १५५ दुचाकी वाहनांसाठी वाहन तळाची सुविधा निर्माण होणार आहे. त्यामुळे वाशी सेक्टर १२ आणि आजूबाजूच्या परिसरातील पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणावर मार्गी लागेल, असा विश्वास लोकनेते आमदार नाईक यांनी या वेळी व्यक्त केला.**

### सद्यस्थितीत ४२ टक्के काम पूर्ण

**सद्यस्थितीमध्ये या प्रकल्पाचे ४२ टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाच्या कामाला गती देऊन पुढील सात ते आठ महिन्यांमध्ये या प्रकल्पाचे काम पूर्ण करून या प्रकल्पातील सुविधांचे लोकार्पण करावे अशी सूचना या वेळी आमदार गणेश नाईक यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना केली. या प्रकल्पाचे काम पूर्ण करत असताना त्याची गुणवत्ता सर्वोत्तम राहील याकडे काटेकोरपणे लक्ष देण्याची सूचनादेखील महापालिका प्रशासनाला केली आहे.**

### प्रकल्पात 'या' सुविधा असणार

**तळमजल्यावर आठ बस थांब इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन वाहन तळ, एनएमएमटी कंट्रोल रूम तर आणि पहिल्या मजल्यावर ११ शो रूम, दुसऱ्या मजल्यावर फिल्टरेशन प्लांट वाहनतळ, तिसऱ्या मजल्यावर खेळण्याच्या सुविधा स्क्रेश कोर्ट योगा रूम स्पोर्ट्स हॉल वाहनतळ, चौथ्या मजल्यावर ऑलिम्पिक आकाराचा स्विमिंग पूल (२५ मिटर बाय ५० मिटर) कॅफेटेरिया वाहनतळ स्वच्छतागृह, पाचव्या मजल्यावर इनडोर गेम्स रूम, योगा रूम, मीडिया रूम, स्पोर्ट्स स्वच्छतागृह ४५० असे क्षमतेचे स्टेडियम, सहाव्या आणि सातव्या मजल्यावर कार्यालय, आठव्या मजल्यावर बँक्वेट हॉल असणार आहे.**

# रेल्वेची संरक्षण भिंत तोडून खडीची वाहतूक

## कारवाई करण्याची नागरिकांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरी सेक्टर २६ परिसरातील कोपरी पुलाखालील रेल्वेची संरक्षण भिंत रेल्वेच्या ठेकेदाराने तोडून याठिकाणी कोणताही वाहतुकीचा रस्ता नसताना दगड व खडी यांची वाहतूक सुरू केली आहे. हे कामकाज २४ तास सुरू असल्याने तसेच वाहतुकीने व त्यातून होणाऱ्या आवाजाने नागरिक त्रस्त झाले आहेत. याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळ, पोलीस व पालिकेकडून कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

साठवणूक करण्याच्या हेतूने वाहतूक सुरू आहे. ही होत असलेली वाहतूक इतकी घातक आहे की अचानक डंपरसमोर आल्यामुळे भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. यामध्ये एखाद्याचा जीवही जाऊ शकतो तसेच संरक्षण भिंत ही अनधिकृतरित्या कोणत्याही सक्षम प्राधिकरणाकडून परवानगी न घेता तोडलेली आहे. यामुळे या परिसरांत अपघात घडून एखादा अनुचित प्रकार घडू नये यासाठी कोणताही वाहतुकीचा अधिकृत रस्ता नसताना सुरू असलेली वाहतूक रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिक सातत्याने करीत आहेत.

> **कोपरी गाव सेक्टर २६ या ठिकाणी रेल्वे यार्ड आहे त्यातून संबंधित कंपनीकडून खडी व दगड यांची वाहतूक केली जात आहे. २४ तास सुरू असलेल्या या कामामुळे सातत्याने ध्वनी प्रदुषण होत आहे. तसेच उडणाऱ्या धुळीमुळे वायू प्रदूषणात भर पडली आहे.**
>
> **–संकेत डोके, भाजप पदाधिकारी, पर्यावरणवादी कार्यकर्ते**



# ज्येष्ठ नागरिक संघात विपश्यना मेडीटेशनवर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल शहर येथे विपश्यना मेडीटेशनवर मार्गदर्शन संघाच्या साप्ताहिक सभेमध्ये बुधवारी (दि. २६) करण्यात आले.

या वेळी बोलताना संस्थेचे सभासद संपत शेडगे यांच्या सुष्णा ज्योती संग्राम शेडगे म्हणाल्या की, ही श्वासावर आधारित ध्यान पद्धती आहे. या पद्धतीमुळे आपल्या स्वभावातील दोष दूर होतात. मन प्रसन्न राहते. ताण तणाव विरहित जीवन जगण्याचा मार्ग सापडतो. हा १०दिवसाचा कोर्स असून तो शिबिराद्वारे घेतला जातो. त्यानंतर नेहमी सराव म्हणून दिवसातून दोन वेळा ही ध्यान धारणा साधना करायला हवी. इगतपुरी, पाली रत्नागिरी, येथे व अनेक ठिकाणी यांची सेंटर आहेत.



या वेळी इगतपुरी येथील सेंटर मध्ये ही ध्यान धारणा कशी केली जाते याचे व्हिडिओ चित्रणाद्वारे माहिती देण्यात आली. सौ. शेडगे यांचा भेटवस्तु देऊन गौरव करण्यात आला. या वेळी समाजात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यकारिणी सदस्य, सभासद यांचा संस्थेतर्फे संघाचे अध्यक्ष जयवंत गुर्जर यांच्या हस्ते गुलाब पुष्प देउन गौरविण्यात आले. यामध्ये सामाजिक कार्यकर्त्या संस्थेच्या उपध्यक्ष्या माधुरी गोसावी, सभासद विद्या चव्हाण, अनुप्रिया काळन, दत्ता ढोले यांचा समावेश होता.

या वेळी सचिव सुनील खेडेकर पत्रकार लेखक दिलीप रेडकर बहुसंख्य स्त्री व पुरुष सभासद उपस्थित होते.

# मुख्यालयाच्या आवारात देशी प्रजातींचे वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

माझी वसुंधरा अभियानांतर्गत नवी मुंबई महापालिकेने नेहमीच नैसर्गिक पंचतत्वांच्या रक्षण व संवर्धनासाठी विविध उपक्रम व्यापक लोकसहभाग घेऊन राबविले असून यामुळेच महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियानांतर्गत नवी मुंबई हे राज्यातील क्रमांक एक चे पर्यावरणशील शहर म्हणून नावाजले गेले आहे.

सन २०२३-२४मधील माझी वसुंधरा अभियानाला सामोरे जाताना महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिकेने वैविध्यपूर्ण उपक्रमांचे नियोजन केले असून २२ एप्रिल या जागतिक पृथ्वी दिवसापासून पर्यावरण रक्षण व संवर्धनाचे कार्यक्रम राबविले जात आहेत. या वर्षीही जागतिक पृथ्वी दिनाची संकल्पना 'आपल्या पृथ्वीमध्ये गुंतवणूक करा' यास अनुसरून विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असून आज महापालिका मुख्यालयाच्या आयकॉनिक इमारतीसमोरील प्रांगणात अतिरिक्त आयुक्त संजय काकडे व प्रशासन आणि उद्यान विभागाचे उपआयुक्त नितीन नार्वेकर आणि इतर मान्यवरांच्या शुभहस्ते कडुनिंबाची बृक्षरोपे लावण्यात आली.



नवी मुंबई महापालिकेच्या वतीने वृक्षारोपण करताना प्राधान्याने देशी वृक्षांची लागवड करण्यात येत असून माझी वसुंधरा अभियानाच्या नमुंमपा नोड़ल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांच्या नियंत्रणाखाली हरित नवी मुंबई हे उद्दिष्ट साकारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यामध्ये कमी जागेत जास्त संख्येने वृक्ष लागवडीची मियावाकी पध्दत शहरी जंगल निर्मितीसाठी वापरली जात आहे. त्याचप्रमाणे इतरही ठिकाणी जागेच्या उपलब्धतेनुसार वृक्ष लागवड करण्यात येत आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या आवारात झालेल्या वृक्षारोपणाचे नियोजन उद्यान विभागामार्फत उद्यान अधिक्षक भालचंद्र गवळी व वरिष्ठ उद्यान सहाय्यक विजय कांबळे यांनी सुनियोजित रितीने केले.

## निवडक

### लग्नाचे आमिष दाखवून शोषण

**पनवेल :** लग्नाचे आमिष दाखवून एका २९ वर्षीय तरुणीचे वर्षभर लैंगिक शोषण केल्याची घटना तळोजा परिसरात घडली आहे. याप्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पीडित तरुणी हि तळोजे फेज २ येथे राहण्यास असून तिचे एका २५ वर्षीय तरुणासोबत प्रेमसंबंध निर्माण झाले. त्यांनतर जून २०२२ ते एप्रिल २०२३ या काळात त्या तरुणाने पीडित तरुणीचा विश्वास संपादन करीत लग्नाचे आमिष दाखवून एका लॉजवर नेऊन तिचे लैंगिक शोषण केले. त्यानंतर पीडित तरुणीने लग्नाबाबत विचारणा केली असता त्याने स्पष्ट शब्दांत लग्नास नकार दिला. आपला विश्वासघात झाल्याचे लक्षात आल्यावर पीडित तरुणीने तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

### जांभिवली येथून विवाहिता बेपत्ता

**मोहोपाडा :** पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील मौजे जांभिवली गावातून विवाहिता बेपत्ता झाल्याची घटना घडली असून रसायनी पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार दाखल करण्यात आली आहे. वनिता अनंता पवार (वय २६, रा. जांभिवली, ता. पनवेल, जि. रायगड) असे बेपत्ता विवाहित महिलेचे नाव असून उंची पाच फूट दोन इंच, रंगाने गहू वर्णिय, केस काळे, नाक सरळ, डोळे काळे, अंगाने सडपातळ, डाव्या हाताच्या अंगठ्यावर पानाच्या आकाराचे गोंदण, गळ्यात अर्ध्या तोळ्याचे मंगळसूत्र असे या महिलेचे वर्णन असून ही कोनासही काही एक न सांगता घरातून निघून गेली आहे. ती अद्यापपर्यंत घरी आली नाही. ही महिला कोठे दिसल्यास रसायनी पोलीस ठाण्याचे अंमलदार एस. एस. पाटील यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# बेकायदा उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाईची मागणी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ (पूर्व) सेक्टर ३ मधील कै. राजीव गांधी उड्डाणपुलाली सर्रास बेकायदा वाहन पार्किंग केली जात असल्याचे आढळून येते. नेरूळ विभागात बँकासमोर काही मिनिटांसाठी उभ्या केलेल्या वाहनावर वाहतूक विभागाचे टोइंग व्हॅन त्वरित कारवाई करत असते. याचप्रकारे चोवीस तास येथे बेकायदा उभ्या असणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

नेरूळ विभागातील पूर्व भागात सेक्टर ३ शिरवणे गाव शेजारी कै. राजीव गांधी उड्डाणपुल आहे. या उड्डाणपुलाच्या खाली रासरोजपणे दुचाकी आणि चारचाकी वाहने उभी असल लेली पहावयास मिळतात, मात्र या बेकायदा उभ्या केलेल्या वाहनावर नवी मुंबई वाहतूक विभाग कारवाई करत असल्याचे कधीही निदर्शनास येत नाही. येथे दिवसभर पार्क करून ठेवलेल्या वाहनांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. नवी मुंबई मनपा परिवहन सेवेची बस क्र. २१ येथून शिरवणे मार्गे वाशीकडे मार्गक्रमण करीत असते या बसेस सह मोठ्या वाहनांना वळसा घालण्यास तारेवरची कसरत करावी लागते.

स्टेशन परिसर, विविध बँकासमोर काही मिनिटांसाठी पार्क करून ठेवलेल्या दुचाकी वाहनावर नवी मुंबई वाहतूक पोलिसांची टोइंग व्हॅन तत्काळ वेळ न दवडता झडप घालते, मग येथे राजीव गांधी उड्डाणपुलाच्या खाली पार्क करून ठेवलेल्या वाहनावर कारवाई का करीत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

# उद्यानातील साहित्य गायब

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर ८ मधील छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक उद्यानातील व्यायामाचे साहित्य गायब झाली आहेत. नागरिक येथे सकाळी आणि संध्याकाळी येत असतात. येथील व्यायामासाठी असलेली महागडी आर्म व्हीलथ्सह इतर साहित्य, खेळणी गायब झाली आहेत. या ठिकाणी दोन शिफ्टमध्ये सुरक्षा रक्षक तैनात असतानाही महागडी साहित्य गायब कशी होतात, असा सवाल येथे येणाऱ्या नागरिकांनी उपस्थित केला आहे.

नवी मुंबई मनपाच्या उद्यान विभागाने उद्यान खुले असल्याच्या वेळेत सुरक्षा रक्षक तैनात असताना महागडी साहित्य गायब कशी होतात, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नवी मुंबई मनपाच्या उद्यान विभागाने व्यायामाची साहित्य उपलब्ध करून दिलेली आहेत, मात्र ही साहित्य मागील आठवडा भरापासून गायब आहेत. इतर साहित्यही तुटलेल्या अवस्थेत असून उद्यान विभागाने तातडीने खेळच्या साहित्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी भाजपचे नेरूळ वॉर्ड अध्यक्ष गणेश रसाळ यांनी केली आहे.

# स्वच्छताकर्मींसाठी योग उपक्रम

## ■ गायक शंकर महादेवन यांची उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर २९ येथील राजीव गांधी उद्यानात सकाळी ७.३० ते ८च्या दरम्यान नवी मुंबई महापालिकेच्या वतीने वाशी विभागातील स्वच्छतामित्रांसाठी 'स्वच्छतेतून आरोग्य व आरोग्यसाठी योग' या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सहजयोग मेडिटेशन संस्थेचे योग प्रशिक्षक चंद्रशेखर खेरोडकर यांच्याकडून योगाचे धडे दिले.

या वेळी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, गायक शंकर महादेवन, आयुक्त व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे आणि इतर अधिकारी, कर्मचारीही उत्साहाने योगप्रशिक्षणात सहभागी झाले होते.

नवी मुंबई महापालिकेला आजवर राज्यात, देशात जे बहुमान लाभले त्यामध्ये सर्वात मोठा वाटा ऊन, पाऊस, थंडीची पर्वा न करता शहर स्वच्छतेसाठी झटणाऱ्या स्वच्छताकर्मींचा आहे. अशा आपल्या स्वच्छतामित्रांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महापालिका योग शिबिर आयोजित करीत आहे ही अत्यंत कौतुकास्पद गोष्ट असल्याचे शंकर महादेवन यांनी या वेळी सांगितले.

योगाचे महत्त्व निरोगी जीवनासाठी अत्यंत मोठे असून नवी मुंबई महापालिका आपल्या स्वच्छतामित्रांच्या आरोग्य जपणूकीसाठी योगाचा आधार घेऊन प्रत्येक विभागात योग शिबिर आयोजित करीत असल्याचे या वेळी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सांगितले.

याआधी बेलापूर, नेरूळ व ऐरोली या विभागांमध्ये अशा प्रकारची योग शिबिरे झाली आहेत. नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महिला स्वच्छताकर्मींसाठीही विभागाविभागांत सभागृहांमध्ये अशा प्रकारचे योग प्रशिक्षण उपक्रम राबविण्याचे नियोजन असल्याचे आयुक्तांनी या वेळी सांगितले.



# मुरूड तालुक्यात मासळीचा तुटवडा



(छाया : संजय करडे)

## मच्छीमार नौका किनाऱ्यावर; खवय्यांचे वांदे

**मुरूड : प्रतिनिधी**

मार्चपासून अपेक्षित मासळी मिळत नसल्याने खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मुरूड तालुक्यातील ५५ ते ६० टक्के होड्या समुद्रकिनारी विसावल्याचे चित्र मुरूड, एकदरा, राजपुरी, आगरदांडा, कोर्लई, बोर्ली किनारी दिसत आहेत.

मच्छिमार होड्या समुद्रात न गेल्यामुळे ताजी मासळी बाजारातून गायब झाली आहे. सामान्यांनाही चढ्या भावाने मासळी खरेदी करणे खिशाला परवडनासे झाले आहे. समुद्रात होणाऱ्या बदलांमुळे तसेच वाऱ्याची दिशा बदलल्यामुळे खोल समुद्रात देखिल मासळी मिळत नसल्याने मच्छिमारांची चिंता वाढू लागली आहे. दादली पद्धतीने मच्छिमारी नौका अनक्रमे दोन, चार वा सहा सिलेंडरच्या होड्या मासेमारीसाठी वापरल्या जातात, परंतु मिळणारी मासळी आणि त्यावर होणारा खर्च याचा कुठेही ताळमेळ बसत नसल्याने होड्या किनाऱ्यावरच सुरक्षित ठेवणे बरे अशा भूमिकेत मच्छिमार बांधव आहेत.

एलईडी पद्धतीने होणाऱ्या मासेमारीमुळे पारंपरिक मासेमारी करणाऱ्या मच्छिमार बांधवांची अडचण झाली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत मुरूड बाजारात मासळीची आवक प्रचंड घटली असून बाहेरून आलेल्या मासळीसाठी सामान्यांना अधिक पैसे मोजवे लागत आहेत.

मासळीच्या तुटवड्यासंबधी जयभवानी मच्छिमार सोसायटीचे व्हाईस चेअरमन महेंद्र गार्डी यांना विचारले असता ते म्हणाले की, एलईडी मासेमारी बंद झाल्याशिवाय सामान्य मच्छिमाराला समुद्रात मासळी मिळणार नाही. डिझेलचा खर्चही निघत नसल्याने नाखवांनी होड्या किनाऱ्यावर दोन महिन्यांपासून नांगरून ठेवल्या आहेत. राज्य मच्छिमार संघातर्फे कर्जमाफी मिळावी, अशी मागणी गार्डी यांनी केली आहे.

राज्य शासनाकडून रायगड जिल्ह्यातील मच्छिमार संस्थांना डिझेल परताव्याची कोट्यवधींची रक्कम येणे आहे. डिझेल परतावा वेळेवर मिळाल्यास मच्छिमार संस्थांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी व्यक्त केली आहे.

**रायगड जिल्ह्यात गेल्या आर्थिक वर्षात ३० कोटी रुपये डिझेल परताव्याची रक्कम डीबीटीद्वारे जमा केली असून निधीअभावी २४ कोटी रुपये परतावा मिळालेला नाही. निधी प्राप्त होताच वितरित करण्यात येईल.**

**–संजय पाटील, सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग, अलिबाग**

## खंडाळा घाटात अपघात; दोन युवक गंभीर जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**



मुंबई पुणे महामार्गावर खंडाळा घाटात खंडाळा गावातून मोहपाडा रसायनी येथे दोन युवक मोटरसायकलवरून सायमाळ या ठिकाणी घाटातून उतरत असताना, रस्त्याच्या कडेला असणाऱ्या बेरिगेटला धडकून ते दोघे खाली खड्ड्यात पडले. सदरची घटना रात्र १०.३० वाजता घडली.

या घटनेची खबर अपघातग्रस्त मदत टीमला मिळाल्यानंतर गुरु साठीलकर व त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनी खड्ड्यांमध्ये उतरून त्या दोघांना जखमी अवस्थेत वर आणून रुग्णवाहिकेतून खोपोली नगरपरिषद रुग्णालयात आणले, परंतु गंभीर जखमी असल्यामुळे दोघांना एमजीएम कामोठे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. गणेश तावरे हे जखमी युवकाचे नाव आहे तो रसायनी परिसरातील नवीन पोसरी या गावचा रहिवासी आहे,अन्य सहकारी मित्राचे नाव समजले नाही. या घटनेबाबत खोपोली पोलीस पुढील तपास करीत आहे.

## बोरघाटात कार जळाली



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील एचओसी ब्रिज परीसरात मुंबई पुणे लेनवर किमी ४३.१०० येथे रात्री ८ वा सुमारास स्विफ्ट कार क्रमांक कार एमएच०२/बीटी/६७४३ वरील चालक नामे कृष्णा शिर्के राहणार बीड हा मुंबई ते पुणे असे येत असताना अचानक गाडीने पेट घेतला असता आय आर. बी. देवदूत टीम ने आग विझवण्यात आली आहे. तसेच जीवितहानी वगैरे काही झालेली नाही. तसेच जळीत वाहन रस्त्याच्या साईडला घेऊन वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. अपघाताबाबतची माहिती खोपोली पोलीस ठाणे यांना कळविण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे महामार्ग पो. केंद्र, बोरघाट करीत आहेत.

## रोहा न्यायालयात उद्या राष्ट्रीय लोक अदालत

**नागोठणे : बातमीदार**

जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्ष व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि. ३०) राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन रोहा तालुका विधी सेवा समिती यांच्यामार्फत दिवाणी व फौजदारी न्यायालयात करण्यात आले आहे.

या वेळी रोहा न्यायालयातील प्रलंबित तडजोड पात्र खटले, दिवाणी दावे, वादपूर्व प्रकरणे, वित्तीय संस्था, बी.एस.एन.एल., ग्रामपंचायती, नगर परिषद, बँका, वीज वितरण कंपनी यांच्याकडील प्रकरणे तडजोडीने मिटविण्यासाठी ठेवण्यात येतील. पक्षकारांनी आपापली जास्तीत जास्त प्रकरणे लोकन्यायालयाच्या माध्यमातून निकाली काढण्यासाठी लोक अदालतीचा लाभ घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जनसुरक्षा मोहिमत प्रत्येक नागरिकाला सामावून घ्यावे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

**जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या सूचना**

जनसुरक्षा मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेमध्ये सामावून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे यांनी ग्रामपंचायत प्रशासन व जिल्ह्यातील बँकर्सना केले.

भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या सूचनेनुसार ग्रामपंचायत स्तरावर जन सुरक्षा मोहीम राबवण्याबाबत विशेष जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २६) जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृह येथे घेण्यात आली, त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी बँक ऑफ इंडिया रायगडच्या विभाग प्रमुख शंपा बिस्वास, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत) राजेंद्र भालेराव, प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, जिल्हा विकास अधिकारी नाबार्डतर्फे प्रदीप अपसुंदे आणि विविध बँकांचे जिल्हा प्रतिनिधी, आर्थिक समावेशन विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

१ एप्रिल ते ३० जूनदरम्यान जनसुरक्षा मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान बँकांच्या मदतीने ग्रामपंचायत स्तरावर विविध तारखांना शिबिरे घेण्यात येणार आहेत. ही शिबिरे यशस्वी होण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी प्रयत्न करावेत, असे सांगून जिल्हाधिकारी योगेश म्हसे पुढे म्हणाले की, या योजनांबाबत व्यापक जनजागृती करून जिल्ह्यातील प्रत्येक गावातील नागरिकांना या विमा योजनेत सहभागी करून घ्यावे. नागरिकांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी भित्तीपत्रके, माहितीपत्रिकांचे वाटप करा. समाज माध्यमांसह विविध माध्यमांद्वारे योजनेची व्यापक प्रसिद्धी करा. बचतगटातील महिलांना या मोहिमेंतर्गत सामावून घेण्याबाबतही जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व महिला आर्थिक विकास महामंडळाला सूचना केल्या.

जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी यांनी जिल्ह्यातील प्रत्येक बँकेला २०११मधील जणगणनेनुसार ग्रामपंचायती बँक शाखानिहाय विभागणी आणि मेळाव्याचे ठिकाण आणि मेळाव्याची तारीख निश्चित झाली असून संबधित बँकांना ग्रामपंचायतमध्ये मेळावे घेण्यासाठी पूर्ण नियोजपूर्वक आराखडा पाठवला आहे.

## झिराड ग्रामपंचायत झाली डिजिटल



### इंटरनेट व लँडलाईन सेवा भारत उद्यामी योजनेचा शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

झिराड ग्रामपंचायतमार्फत बीएसएनएल फायबर इंटरनेट व लँडलाईन सेवा भारत उद्यामी योजना राबविण्यात येत आहे. जोडणीसाठी ४५०० रुपये खर्च येतो. या योजनेंतर्गत झिराड ग्रामपंचायतीमध्ये मोफत जोडणी करून दिली जात आहे.

भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ही योजना झिराड ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यात येत आहे. सरपंच दर्शना भोईर यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी दिलीप भोईर, अशोक वारगे, जगदीश मानकर उपस्थित होते. झिराड ग्रामपंचायत विभागात रिक्षाध्वनी संदेशमार्फत जनजागृती करण्यात येत आहे.

## जिते येथील लक्ष्मी नारायण महोत्सवाची सांगता

**पेण : प्रतिनिधी**

जिते येथील लक्ष्मी नारायण वार्षिक प्रतिष्ठानतर्फे १८ ते २३ एप्रिलदरम्यान महोत्सव उत्साहात झाला.

या महोत्सवात पहाटे ४ ते ६ वाजता अभिषेक व काकड आरती, सकाळी ९ ते १२ ज्ञानेश्वरी वाचन दुपारी १ ते २ वाजेपर्यंत भजन दुपारी ३ ते ५ वाजता ज्ञानेश्वरी वाचन सायंकाळी ५ वाजता हरिपाठ झाला. १८ एप्रिल रोजी चार वाजता ज्ञानेश्वर मंडळ जिते व पंचक्रोशी मंडळ यांचे हरिपाठ, पखवाज प्रणित पाटील होते. रात्रौ ९ वाजता एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज हभप योगीराज महाराज गोसावी पैठण यांचे कीर्तन झाले. बुधवारी जय हनुमान हरिपाठ मंडळ देहेन यांचा हरिपाठ, रात्रौ ९ वाजता हभप मधुकर महाराज मावळ पुणे यांचे कीर्तन, गुरुवारी संजीवनी हरिपाठ मंडळ तरणखोप यांचा हरिपाठ, रात्रौ ९ वाजता हभप वृदांताई आळंदी यांचे कीर्तन, शुक्रवारी सायंकाळी ४ वाजता संत समागम सोहळा, दीपोत्सव सायंकाळी ७ वाजता, कीर्तन रात्रौ ९ तालमणी भास्कर म्हात्रे व हार्मोनियम रंगनाथ लिमये पेण हे होते. शनिवारी पुष्पवृष्टीचे किर्तन प्राची मंदार व्यास यांचे ९: ३० वाजता कीर्तन झाले. रविवारी सायंकाळी ६ वाजता लक्ष्मी नारायण बालगोपाल हरिपाठ मंडळ गीते यांचा हरिपाठ रात्री ९ वाजता हभप प्राची व्यास यांचे ललिताचे कीर्तन झाले.

## केएमसी महाविद्यालयात पदवी प्रदान सोहळा

**खोपोली : प्रतिनिधी**



खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे केएमसी महाविद्यालयातून सन २०२१–२२ शैक्षणिक वर्षात मुंबई विद्यापीठाची पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा मंगळवारी (दि. २५) महाविद्यालयाच्या सभागृहात झाला.

कला, विज्ञान, वाणिज्य आणि संगणक शाखांमधील एकूण ५०० ते ६०० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सोहळ्यासाठी नायब तहसीलदार पुरूषोत्तम थोरात, केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, माजी अध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर, कार्यवाहक किशोर पाटील, संस्थेचे सदस्य दिलीप पोरवाल, भास्कर लांडगे, चंद्रकांत केदारी, केएमसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे उपाध्यक्ष राजू अभाणी यांनी केले.

संस्थेच्या आजी–माजी सदस्यांनी मेहनत महाविद्यालय उभे केले आहे. त्यांच्या मेहनतीचे चीज करा, असे अवाहन प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांनी करीत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. नायब तहसीलदार पुरूषोत्तम थोरात यांनी, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करण्यासाठी पुण्यात वातावरण चांगले असून तुम्हाला हवी ती मदत अभ्यासासाठी करण्याचे आश्वासन दिले. कार्यवाहक किशोर पाटील यांनी महाविद्यालय उभे करण्यासाठी वडील माजी मंत्री कै. बी. एल. पाटील यांचे स्मरण करीत लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्ष झाले असल्याचे सांगत पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षण पूर्ण करून महाविद्यालयाचे नावलौकीक करा, असेही म्हणाले. कार्यक्रमाचे सुंत्रसंचालन, आभार प्रदर्शन प्रा. नन्नावरे यांनी केले.

## उतेखोल येथील आश्रमशाळेत व्यक्तिमत्त्व विकास शिबिर





**माणगाव : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र कोकण प्रांताचे विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर उतेखोल येथे २० ते २३ एप्रिल दरम्यान उत्साहात झाले.

या शिबिराचे उद्घाटन पश्चिम क्षेत्र छात्रवास प्रमुख प्रदीप पाटील, प्रांत सहसचिव परशुराम गावीत, प्रांत छात्रवास प्रमुख यांच्या उपस्थितीत झाले. कोकण प्रांतातील आठपैकी सहा छात्रवासातील एकूण ४३ विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांच बौद्धिक, मानसिक, जनजाती संस्कृती, जनजाती क्रांतिकारक माहिती, स्वतःचा विकास, मनोरंजन, देशभक्ती चित्रपट, वारली कला असे विविध विषयांवर विशेष मार्गदर्शन अखिल भारतीय प्रचार प्रसार प्रमुख महेश काळे, प्रांत जनजाती सुरक्षा मंच प्रमुख सुदाम पवार, कुलाबा जिल्हा सचिव रविंद्र पाटील, प्रांत युवा प्रमुख उत्तम पाटील, कार्यकर्ता अजित शेडगे, विलास ठाकरे रायगड जिल्हा संघटन मंत्री, योगा प्रमुख प्रतिभा पोळेकर यांनी मार्गदर्शन केले.

शनिवारी वर्गाचा समारोप रायगड जिल्हा सचिव मनोज कामत यांच्या उपस्थितीत होऊन रविवारी हरिहरेश्वर, श्रीवर्धन, दिवेआगार सुवर्ण गणेश मंदिर, समुद्र चौपाटी येथे मुलांची सहल आयोजित करण्यात आली होती. अतिशय आनंदमय वातावरणात उत्तम प्रकारे शिबिर संपन्न झाले. कोकण प्रांत छात्रवास प्रमुख दिलीप मांगीलाल पावरा व वनवासी कल्याण आश्रम माणगाव येथील कार्यकर्त्यांनी व्यवस्थापन केले.

## कर्जतमध्ये छायाचित्रकारांच्या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यातील छायाचित्रकारांची कार्यशाळा कर्जत फोटोग्राफर असोसिएशन यांच्याकडून आयोजित करण्यात आली होती. विविध प्रकारचे दर्जेदार कॅमेरे निर्माण करणाऱ्या निकॉन कंपनीकडून हे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. तालुक्यातील १००हून अधिक फोटोग्राफर यांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, तर आंतरराष्ट्रीय दर्जाचे छायाचित्रकार पराग शिंदे यांचे सर्वना मार्गदर्शन लाभले.

रायगड फोटोग्राफर असोसिएशन संलग्न असलेल्या कर्जत–नेरळ फोटोग्राफर असोसिएशनतर्फे निकोन कंपनीची कार्यशाळा रॉयल गार्डन येथे आयोजित करण्यात आली होती. या वेळी जिल्हा फोटोग्राफर असोसिएशनचे सल्लागार विवेक सुबेकर, तर प्रमुख पाहुणे रायगड फोटोग्राफर अध्यक्ष समीर भायदे, कार्याध्यक्ष विवेक सुभेकर, खजिनदार जितेंद्र मेहता, सेक्रेटरी आनंद निंबरे उपस्थित होते. कार्यक्रमात अनंत देवळे यांचा सत्कार शिंदे यांचेहस्ते केला.

पराग शिंदे यांनी कार्यशाळेत निकॉन कंपनीच्या विविध कॅमऱ्यांची माहिती दिली. दिवसभर दोन सत्र घेत सोप्या भाषेत लायटिंग प्रॅक्टिकल शिकवली तसेच ग्राहक मिळविण्यासाठीची कला यांचीदेखील माहिती दिली. नवीन ऑर्डर्स घेण्याबाबत जे काही आपल्याला करायला पाहिजे त्याबद्दल सखोल चर्चा आणि त्यावर सर्वांचे समाधान होईपर्यंत उपाय सुचवले तर दुसऱ्या सत्रास आऊटडोर फोटोग्राफी कशी करायची व असलेल्या लाईटचा कसा वापर करायचा हे त्यांनी सांगितले. कार्यशाळेसाठी पुढाकार घेणारे कर्जत नेरळ फोटोग्राफर असोसिएशनकडून निकॉन कंपनीचे मेंटॉर पराग शिंदे, कंपनीचे अधिकारी गौडा यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यावेळी जिल्हा असोसिएशनचे अविनाश राऊत, दीपक बडगुजर यांच्यासह कर्जत असोसिएशनचे अध्यक्ष योगेश कुंभार, सेक्रेटरी विदुल सावंत, खजिनदार ज्ञानेश्वर बागडे तसेच नेरळ फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष रवी पेरणे आदी उपस्थित होते.

# राजस्थान पुन्हा नंबर वन!

**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शुक्रवारी जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्जवर ३२ धावांनी शानदार विजय साकारला. प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने २० षटकांत पाच गडी गमावून २०२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात चेन्नई संघ सहा गड्यांच्या मोबदल्यात १७० धावाच करू शकला. यासोबतच चेन्नईला गुणतालिकेतही पछाडत चेन्नई संघ आता पहिल्या स्थानावर आला आहे.



अनुभवी गोलंदाज ट्रेंट बोल्टच्या गैरहजेरीतही राजस्थानच्या गोलंदाजांनी पॉवर-प्लेमध्ये कसून गोलंदाजी केली. डेव्हॉन कॉनवे आणि ऋतुराज गायकवाड या फॉर्मात असलेल्या फलंदाजांना मोठा फटका मारता येत नव्हता. सहाव्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर कॉनवे आठ धावांवर बाद झाला. ऋतुराजने २९ चेंडूंत पाच चौकार व एका षटकारासह ४७ धावा केल्या. आर अश्विनने पुन्हा एकदा अजिंक्य राहणेची (१५) विकेट घेताना चेन्नईला अडचणीत आणले. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेला अंबाती रायुडू भोपळाही न फोडता तंबूत परतला. ॲडम झम्पाने तीन गडी बाद करीत राजस्थानच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

मोईन अली आणि शिवम दुबे यांनी चेन्नईच्या डावाला हळुहळू आकार देण्यास सुरुवात केली. त्यांची ५१ धावांची

## चेन्नईवर मात

भागीदारी झम्पाने मोडली आणि त्याने अलीला (२३) गुगलीवर झेलबाद केले. चेन्नईला ३० चेंडूंत विजयासाठी ७८ धावा करायच्या होत्या. दुबे चांगली फटकेबाजी करत होता आणि त्याने २९ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. जेसन होल्डरने १९व्या षटकात उत्तम मारा केला आणि नऊ धावा दिल्या. मग सहा चेंडू ३७ असे अशक्य आव्हान चेन्नईसमोर आले, मात्र त्यांना ६ बाद १७० धावा करता आल्या. दुबे ५२ धावांवर अखेरच्या चेंडूवर झेलबाद झाला.

तत्पूर्वी, राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. यशस्वी जैस्वालने ४३ चेंडूंत आठ चौकार व चार षटकारांसह ७७ धावा केल्या. त्याने जॉस बटलरसह (२७) पहिल्या विकेटसाठी ८६ धावा जोडल्या. सॅमसन (१७) आणि यशस्वी यांना तुषार देशपांडेने एकाच षटकात माघारी पाठवले. देवदत्त पडिक्कल व ध्रुव जुरेल यांनी अखेरच्या षटकांत चांगली फटकेबाजी करताना २० चेंडूंत ४८ धावा जोडल्या. जुरेल १५ चेंडूंत ३४ धावांवर धावचीत झाला, तर पडिक्कल १३ चेंडूंत २३ धावांवर नाबाद राहिला.

आयपीएलमधील हा राजस्थानचा २००वा सामना होता आणि त्यांनी जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदा २००+ धावा केल्या. त्यानंतर मोठा विजयही मिळवला. या विजयासह राजस्थान संघ आठ सामन्यांत पाच विजय आणि १० गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहचला आहे.

# अर्थ प्लॅनेटने पटकाविले मास्टर्स सुपर लीगचे विजेतेपद

**मुंबई : प्रतिनिधी**

अर्थ प्लॅनेटने मास्टर्स सुपर लीग पर्व १चे विजेतेपद पटकाविण्याचा मान मिळविला आहे. लालबाग येथील बिंधुमाधव ठाकरे मनोरंजन मैदानावर झालेल्या या स्पर्धेत अर्थ प्लॅनेटने सट्रन प्लॅनेटचा प्रतिकार ४८-३८ असा मोडून काढत बाजी मारली. अर्थ प्लॅनेटच्या विवेक पोखरकरला सर्वोत्तम खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.




अर्थने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करीत पूर्वार्धातच दोन लोण देत २५-१७ अशी आघाडी घेतली आणि उत्तरार्धातदेखील आणखी एक लोण देत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. पुष्पराज सिंगचा अष्टपैलू खेळ त्याला विवेक पोखरकरची मिळालेली चढाईची साथ यामुळे अर्थला हा विजय शक्य झाला. सट्रनच्या नरेश घाडगे, ध्रुव देवळेकर यांनी अर्थ प्लॅनेटला प्रतिकार करीत उत्तरार्धात एक लोण फिरविला, पण संघाला विजयी करण्यात ते कमी पडले.

या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात अर्थ प्लॅनेटने मरक्युरी प्लॅनेटला ४८-४६ असे चकवित, तर सट्रन प्लॅनेटने मार्स प्लॅनेटचा ७२-२१ असा धुव्वा उडवित अंतिम फेरीत धडक दिली होती.

सट्रन प्लॅनेटचा रोहित संघवी स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईचा, तर अर्थ प्लॅनेटचा पुष्पराज सिंग स्पर्धेतील उत्कृष्ट पकडीचा खेळाडू ठरला. दोन्ही खेळाडूंना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील लक्षवेधी खेळाडू ठरला तो एका हाताने अपंग असलेला गौरव चिंदरकर. त्याला चषक देऊन गौरविण्यात आले.

### सनरायझर्स हैदराबादला मोठा धक्का!

# दुखापतीमुळे वॉशिंग्टन सुंदर आयपीएलबाहेर



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या १६व्या मोसमात सनरायझर्स हैदराबादला मोठा धक्का बसला आहे. स्टार अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर आयपीएल २०२३च्या उर्वरित सामन्यांचा भाग होऊ शकणार नाही. सनरायझर्स हैदराबादने ही माहिती दिली.

वॉशिंग्टन सुंदर आयपीएलच्या १६व्या हंगामात बॅट आणि बॉलने अद्याप प्रभावी ठरला नव्हता. सुंदरने सात सामन्यांच्या पाच डावांमध्ये १५च्या सरासरीने आणि १००च्या स्ट्राइक रेटने केवळ ६० धावा केल्या. या वेळी त्याची सर्वोत्तम धावसंख्या ही नाबाद २४ धावा होती.

गोलंदाजीतही सुंदरने अत्यंत निराशाजनक कामगिरी केली. या मोसमात सुंदरने सात सामन्यांत १७.४ षटके टाकत केवळ तीन विकेट घेतल्या. हे लक्षात घेण्यासारखे आहे की सुंदरने एकाच सामन्यात तीन विकेट्स घेतल्या, तर उर्वरित सहा सामन्यांमध्ये त्याला एकही विकेट विकेट घेता आली नाही.

सुंदर खेळत नसल्याने मधल्या फळीत सनरायझर्स हैदराबादला त्याची उणीव भासेल. एवढेच नाही तर स्पर्धा जसजशी पुढे सरकत जाईल तसतशी खेळपट्ट्या फिरकीपटूंसाठी अधिक उपयुक्त ठरतील. अशा परिस्थितीत त्याची अनुपस्थिती हैदराबादसाठी मोठा धक्का आहे.

# विजय क्लब, लायन्स स्पोर्टस्, अंकुर स्पोर्टस्, जॉली स्पोर्टस्, नवोदित बंड्या मारुती संघांची विजयी सलामी

### राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

बजरंग क्रीडा मंडळाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या सुवर्ण चषक पुरुष गट कबड्डी स्पर्धेत विजय क्लब, लायन्स स्पोर्टस्, अंकुर स्पोर्टस्, जॉली स्पोर्टस्, बंड्या मारुती, नवोदित या संघांनी विजयी सलामी दिली. मुंबईच्या ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना या ठिकाणी ही स्पर्धा सुरू आहे.



उद्घाटनीय सामन्यात विजय क्लबने अ गटात नवी मुंबई प्रशिक्षण केंद्राचा प्रतिकार २७-२३ असा मोडून काढला. अत्यंत चुरशीने खेळलेल्या या सामन्यात विश्रांतीला १४-११ अशी आघाडी विजयकडे होती. लायन्स स्पोर्टस्ने इ गटात पालघरच्या श्रीराम मंडळाला ३५-२९ असे नमवित साखळीत पहिला विजय नोंदविला. राज आचार्य, हर्ष मोरे, शुभम मटकर यांच्या आक्रमक सुरुवातीने लायन्सने मध्यांतराला २०-१२ अशी आघाडी घेतली होती. नंतर मात्र श्रीरामाच्या जयदीप चौधरी, शेखर मोरे यांनी त्यांना विजयाकरिता चांगलेच झुंजविले.

पालघरच्या इच्छाशक्तीने अ गटातील पहिल्या सामन्यात साहिल कदम, यश निंबाळकर, ओमकार पालकर यांच्या चतुरस्र खेळाच्या बळावर अशोक मंडळाचा प्रतिकार ४२-३१ असा मोडून काढत साखळीत विजय नोंदविला. पहिल्या डावात सूरज सुतार, संतोष ठाकूर, उत्कर्ष धनके यांच्या खेळाने आघाडी घेणाऱ्या अशोक मंडळाला नंतर मात्र तो जोश राखता आला नाही. त्यामुळे त्यांचा पराभव झाला. याच गटात शेवटी झालेल्या सामन्यात इच्छाशक्तीने गुड मॉर्निंगला २९-२९ असे बरोबरीत रोखले. अंकुरने ब गटात सुशांत साईल, अभिषेक पाटील यांच्या चढाई-पकडीच्या बळावर उपनगरच्या उत्कर्षचा ४३-३५ असा पराभव केला. मध्यांतराला अंकुरकडे २४-१६ अशी आघाडी होती. उत्कर्षकडून यश मांजरेकर, रूपेश जाधव बरे खेळले.

# गैरवर्तणुकीबद्दल जेसन रॉयला दंड



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध कोलकाता नाइट रायडर्सचा सलामीवीर जेसन रॉय सामन्याचा मानकरी ठरला. इतकी चांगली खेळी करूनही त्याच्या खेळीला गैरवर्तणुकीचे गालबोट लागले. त्यामुळे त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

रॉयने २९ चेंडूंत ५६ धावा ठोकल्या. यात चार चौकार आणि पाच षटकारांचा समावेश होता. त्याने शाहबाज अहमदच्या एकाच षटकात चार षटकार मारले, मात्र आयपीएलच्या नियमावलीचा भंग केल्याबद्दल रॉय दोषी आढळला असून त्याच्या मॅच फीच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला.

१०व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर विजयकुमार वैशाखने रॉयला बोल्ड केले. त्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतताना रॉयने आपला राग दाखवत बॅट हवेत फेकली. त्यांच्या या वागण्यावर बरीच टीकाही झाली होती. त्यासाठी त्याला दंड ठोठवण्यात आला आहे.

### डब्ल्यूटीसी फायनल

## शार्दुलच्या समावेशामुळे भारतीय संघात समतोल



**मुंबई : प्रतिनिधी**


भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निवड समितीने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. बीसीसीआयने एका वर्षानंतर अचानक संघात शार्दुल ठाकूर संधी दिली आहे. या अष्टपैलू खेळाडूमुळे टीम इंडियाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये चांगला समतोल निर्माण झाला आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना ७ जून ते ११ जूनदरम्यान इंग्लंडमधील केनिंग्टन ओव्हल (लंडन) मैदानावर खेळला जाणार आहे. शार्दुल ठाकूर धोकादायक गोलंदाजीसाठी ओळखला जातो. तो तुफानी फलंदाजी करण्यातही माहिर आहे. त्यामुळे त्याला ऑस्ट्रेलियाविरुद्ध संधी देण्यात आली आहे.

# ठाण्यात उद्या रंगणार कबड्डी स्पर्धा

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाण्यात वास्तव्यास असलेल्या रायगड जिल्ह्याच्या सुधागड तालुक्यातील रहिवाशांच्या क्रीडागुणांना वाव देण्यासाठी आमदार संजय केळकर व आमदार निरंजन डावखरे यांच्या मार्गदर्शनाखाली सन्मान फाऊंडेशनचे अध्यक्ष, भाजप ठाणे शहर सचिव तथा सुधागड तालुका रहिवासी सेवा संघाचे सल्लागार रमेश सागळे यांच्या वतीने ठाणे शहर भाजप व सन्मान फाऊंडेशन आयोजित सुधागड तालुकास्तरीय आमदार सन्मान चषक भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवारी (दि. ३०) सकाळी ९.३० वाजल्यापासून चंदनवाडी येथील कॉम्रेड गोदुताई परूळेकर मैदानात खेळली जाणार आहे.



या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थित लाभणार असून ठाणे, रायगड जिल्ह्यातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थिती राहणार आहेत.

ठाण्यातील सुधागड तालुकावासी आणि ठाणेकर नागरिकांनीही या क्रीडा स्पर्धेचा आनंद लुटावा, असे आवाहन आयोजक रमेश सागळे यांनी केले आहे.

गेली अनेक वर्षे सुधागड तालुक्यात होणाऱ्या कबड्डी स्पर्धा ठाणे शहरातील रहिवाशांसाठी व्हायला हव्यात या भावनेने ठाण्यात वास्तव्यास असलेले सुधागड तालुका रहिवासी आणि त्यांच्या विकासासाठी झटणाऱ्या ठाण्यातील सेवाभावी सामाजिक कार्यकर्ते तथा सन्मान फाऊंडेशनचे अध्यक्ष रमेश सागळे यांनी सुधागड तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. सुधागड तालुक्यातील २६ संघाचा समावेश असलेल्या स्पर्धेत राज्यस्तरावरील क्रीडा पंच देखरेख करणार असून या कार्यक्रमासाठी सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे अध्यक्ष विठ्ठल घाडगे व संयोजक कार्याध्यक्ष प्रकाश शिलकर, क्रीडा समिती प्रमुख राकेश थोरवे, चिटणीस अविकांत साळुंखे, जयगणेश दळवी, सुधीर नेमाणे, अजित सागळे, धनंजय खाडे, सुनिल तिडके यांच्यासह तालुक्यातील अनेक सामाजिक कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. विशेष म्हणजे कला, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणार्या तरुण होतकरू खेळाडू, कलाकार यांचा विशेष सन्मान या वेळी करण्यात येणार आहे.

### कुमार गट कबड्डी स्पर्धा

# एसएसजी फाऊंडेशन, शिवनेरी मंडळ, श्रीराम विश्वस्त, सिद्धीप्रभा मंडळ संघ उपांत्य फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

एसएसजी फाऊंडेशन, शिवनेरी मंडळ, श्रीराम विश्वस्त, सिद्धीप्रभा मंडळ यांनी श्री सिद्धेश्वर सेवा मंडळाने आयोजित केलेल्या कुमार गट कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. मुंबईच्या प्रभादेवीतील राजाराम साळवी उद्यानातील स्व. सचिन अनंत शेलार क्रीडांगणावर ही स्पर्धा सुरू आहे. उपांत्य फेरीत एसएसजी विरुद्ध शिवनेरी मंडळ आणि श्रीराम विश्वस्त विरुद्ध सिद्धीप्रभा अशा लढती होतील.

उपांत्यपूर्व सामन्यात श्रीराम विश्वस्तने जय दत्तगुरुला ३०-१७ असे नमवित अंतिम विजेतेपदासाठी आपणही दावेदार आहोत हे दाखवून दिले. पहिल्या डावात एकमेकांचा अंदाज घेत सावध खेळ करणारे दोन्ही संघ ९-९ असे बरोबरीत होते. दुसऱ्या डावात मात्र टॉप गिअर टाकत श्रीरामाने सुसाट खेळ करीत दत्तगुरूचा प्रतिकार सहज मोडून काढला.

शिवनेरी मंडळाने विजय क्लबला ३१-२१ असे नमवित आपली घोडदौड सुरू ठेवली. नुकतेच एका स्पर्धेचे विजेतेपद मिळविलेल्या शिवनेरीने त्याच जोशाने खेळ करीत विजय क्लबला आघाडी घेण्याची संधीच दिली नाही. मध्यांतराला १६-०८ अशी आघाडी घडणाऱ्या शिवनेरीने नंतर मात्र सावध खेळ करीत हा विजय साकारला. यश राक्षेच्या तुफानी चढाया त्याला अजय गुरव, शुभम नेमण यांची मिळालेली चढाई-पकडीची उत्कृष्ट साथ यामुळे हे शक्य झाले. रोहन तिवारी, आयुष साळवी यांनी विजयकडून शेवटच्या क्षणापर्यंत कडवी लढत दिली, पण विजय काय त्यांच्या आवाक्यात आला नाही.



एसएसजी प्रतिष्ठानने संस्कृती प्रतिष्ठानचा ५०-२० असा धुव्वा उडविला. पूर्वार्धात २०-१० अशी आघाडी घेणाऱ्या एसएसजीने उत्तरार्धात अधिक जोशपूर्ण खेळ करीत गुणांचे अर्धशतक गाठले. त्याचबरोबर ३० गुणांच्या मोठ्या फरकाने विजय मिळविला. प्रथमेश तेटगुरे, जितेंद्र यादव, तेजस टक्के यांच्या झंजावाती खेळामुळे हा विजय शक्य झाला.

शेवटच्या सामन्यात होम ग्राउंडवर खेळणाऱ्या सिद्धीप्रभाने काळाचौकीच्या अमर मंडळावर ३६-२४ असा विजय मिळविला. पहिल्या सत्रात ११-१४ अशा पिछाडीवर पडलेल्या सिद्धीप्रभाने दुसऱ्या सत्रात संयमी खेळ करीत ही किमया साधली. रविकांत चौरसिया, विशाल घाडगे, सिद्धेश भोसले यांच्या दुसऱ्या सत्रातील चढाई-पकडीच्या उत्कृष्ट खेळाने हे शक्य झाले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com